सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर बुधवार, २५ सप्टेंबर २०२४ वर्ष दुसरे अंक १८३ पाने : ८ किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# भारतात मंकीपॉक्सचा ‘क्लेड-१-बी’ व्हेरिएंट

मल्लापुरम, २४ सप्टेंबर : मंकीपॉक्स आजाराचा ‘क्लेड-१-बी’ व्हेरिएंट भारतात पोहचला आहे. हा अतिशय खतरनाक असून जगातील अनेक देशांमध्ये याचा कहर आहे. युएईहून केरळच्या मल्लापुरम जिल्ह्यात परतलेल्या केरळच्या इसमामध्ये ‘क्लेड-१-बी’ व्हेरिएंट आढळून आलाय.

मंकीपॉक्सच्या ‘क्लेड-१-बी’ व्हेरिएंटच्या प्रकरणाची पुष्टी करणारा भारत तिसरा देश बनला आहे. ‘क्लेड-१-बी’ व्हेरिएंटचा रुग्ण आढळून आल्यानंतर केरळचा आरोग्य विभाग हाय अलर्टवर आहे. अनेक रुग्णालयांमध्ये मंकीपॉक्सच्या रुग्णांसाठी विशेष वॉर्ड तयार करण्यात आले आहेत. जेणेकरून या व्हायरसचा प्रसार रोखता येईल. केरळचा आरोग्य विभाग मंकीपॉक्स प्रतिबंध आणि उपचारांसाठी सुधारित मार्गदर्शक तत्त्वे जारी करण्याची योजना आखत आहेत.

यासोबतच केंद्रीय आरोग्य विभागही अधिक सतर्क झाला आहे. हा व्हेरिएंट अतिशय धोकादायक आहे, मात्र त्याबाबत बरीच माहिती उपलब्ध आहे. मंकीपॉक्सचा नवीन व्हेरिएंट समोर आल्यानंतर केरळच्या आरोग्य विभागाने नवीन मार्गदर्शक तत्त्वे जारी करण्यासाठी बैठक घेतली. या बैठकीनंतर राज्याच्या आरोग्य मंत्री वीणा जॉर्ज म्हणाल्या की, रुग्णांची संख्या वाढल्यास आवश्यक कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

सर्व जिल्ह्यांमध्ये आयसोलेशन सुविधा उभारण्यात आल्या आहेत आणि विमानतळांसह पाळत ठेवणं अधिक मजबूत करण्यात आले आहे असे त्यांनी एका निवेदनात म्हटले आहे. सध्या ५ प्रयोगशाळांमध्ये टेस्टची व्यवस्था करण्यात आली आहे. गरज भासल्यास टेस्टसाठी प्रयोगशाळांची संख्या वाढवण्यात येईल. मंत्र्यांनी केरळमधील रुग्णामध्ये एमपॉक्स स्ट्रेनची पहिली पुष्टी झाल्याचा उल्लेख केला नसला तरी, त्यांनी जाहीर केलं की राज्यातील एमपॉक्सच्या प्रतिबंधासाठी आणि प्रभावी उपचारांसाठी सुधारित मार्गदर्शक तत्त्वे लवकरच जारी केली जातील.

# लेबनानमध्ये हिजबुल्लाहच्या १९०० ठिकाणांवर हल्ला

## २१ मुले, ३९ महिलांसह ४९२ जणांचा मृत्यू

लेबनान: इस्त्रायल आणि लेबनान यांच्यातील सध्याची स्थिती खूपच बिघडत चालली आहे. गेल्या काही दिवसांपासून दोघांचे एकमेकांवर हवाई हल्ले सुरू आहेत. दरम्यान, यात सर्वाधिक नुकसान लेबनानचे झाले आहे. येथे इस्त्रायलच्या एअर स्ट्राईकमध्ये लेबनानच्या दक्षिण भागात झालेल्या हल्ल्यांमध्ये आतापर्यंत ४९२ लोक मारले गेले आहेत. तर १६४५पेक्षा अधिक जखमी झालेत. मृत्यूमुखी पडलेल्यांमध्ये २१ मुले आणि ३९ महिलांचा समावेश आहे.

बेंजामिन नेतन्याहू यांच्या सैन्याने हिजबुल्लाहच्या साधारण ११०० ठिकाणांवर हल्ले केले आहेत. हे लक्षात घेता इस्त्रायल सरकारने संपूर्ण देशात आगामी ३० सप्टेंबरपर्यंत आणीबाणीची घोषणा केली आहे.



इस्त्रायलच्या सैन्याने सोमवारी सकाळपासून सातत्याने हिजबुल्लाहच्या बेकाच्या क्षेत्रातील दहशतवादी ठिकाणांवर हल्ले केले. या दरम्यान हवाई दलाने कमीत कमी ११०० ठिकाणांना पूर्णपणे उद्धस्त केले. या त्या जागा होत्या जिथे दहशतवादी आपले रॉकेट, मिसाईल्स, लाँचरसाखी धोकादायक हत्यारे ठेवत होते.

यातच इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी लेबनानमध्ये राहणाऱ्या लोकांना व्हिडिओ मेसेजद्वारे धमकीवजा इशारा दिला आहे. त्यांनी लवकरात लवकर आपले ठिकाण सोडावे. हा इशारा गंभीरतेने घ्यावा. आमचे ऑपरेशन संपल्यानंतर लेबनानचे नागरिक आपल्या घरांमध्ये सुरक्षितरित्या परतू शकतात. इस्त्रायलच्या हल्ल्याने भयभीत झालेले १० हजार लेबनानचे नागरिक दक्षिण भागाच्या दिशेने पळाले आहे. यामुळे बंदरगाह शहर सिडोनच्या बाहेर मुख्य राजमार्गांवर कारची मोठी रांग लागली आहे. याशिवाय सरकारने देशातील अनेक भागांमधील शाळा आणि युनिर्व्हसिटी बंद करण्याचे आदेश दिले आहेत. २००६मधील इस्त्रायल आणि लेबनान यांच्यातील युद्धादरम्यान झालेल्या पलायनानंतरचे हे सर्वात मोठे पलायन आहे.

# बिडकीन येथे सकल मराठा समाज बांधवांकडून रस्ता रोको आंदोलन



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि. २४ सप्टेंबर मराठा आरक्षण संघर्ष योद्धा मनोज पाटील जंरागे यांना पाठिंबा देण्यासाठी बिडकीन येथील सकल मराठा समाजाच्या वतीने आज दि. २४ मंगळवार रोजी रस्ता रोको आंदोलन आवाहन करण्यात आले होते या आवाहनाला चांगला प्रतिसाद मिळाला असून या वेळी मराठा समाज बांधव,सर्वधर्मीय, व्यापारी व नागरिकांनी उत्स्फूर्तपणे रस्ता रोको आंदोलन मध्ये सहभागी झाले होते या आंदोलनाला आपला पाठिंबा दर्शविला, सकाळी ११:३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यास अभिवादन करण्यात आले, तसेच रस्ता रोको आंदोलन करुन मराठा आरक्षण मिळालेच पाहिजे घोषणा देण्यात आल्या, तसेच आंदोलन शांततेत पार पडले,यावेळी मनोज मुरदाडे यांनी मराठा समाज बांधवांना मार्गदर्शन केले याप्रसंगी मनोज मुरदाडे,विजय शेजुळ,किरण गुजर,विजय शेळके, मच्छिंद्र हाडे, देविदास चव्हाण, काकासाहेब टेके, कल्याण शिंदे, संतोष कुसेकर, राजू चव्हाण, विष्णू मोगल, कृष्णा उघडे, सचिन हाडे, धनंजय चिरेकर, अशोक हिवाळे,आदी मराठा समाज बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती, रस्ता रोको आंदोलन वेळी पोलीस निरीक्षक प्रमोद पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक नारायण गिते, शिवानंद बनगे, सहाय्यक फौजदार अशोक सोकटकर,संजय चव्हाण, राहुल बल्लाळ, महिला पोलीस कर्मचारी यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता व आंदोलन कार्यकर्त्यांना पोलीसांनी ताब्यात घेतले होते.

### माळीवाडा येथे महापालिकेच्या वतीने डेंगू मुक्त अभियानाचा दहावा रविवार संपन्न

# नागरिकांमध्ये जनजागृती केल्यामुळे डेंगू मुक्त अभियानाला यश - आयुक्त यशवंत डांगे

नगर - महापालिकेच्या माध्यमातून नागरिकांच्या हिताचे निर्णय घेतले जात असून पावसाळ्यामध्ये साथीचे आजार पसरत असल्याकारणाने आरोग्याच्या दृष्टीने समाजामध्ये जनजागृती करण्यासाठी डेंगू मुक्त अभियानाचा दहावा रविवार संपन्न झाला असून नागरिकांच्या घरापर्यंत जाण्याचे काम केले असून डेंगू निर्मितीपाणीसाठे नष्ट केली याचबरोबरउपयोजना करत औषध फवारणी केली त्यामुळे मागील वर्षीपेक्षा यावर्षी डेंगू रुग्णांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात घट झाली असून डेंगू मुक्त अभियानाला यश आले. असल्याची माहिती आयुक्त यशवंत डांगे यांनी दिली.



माळीवाडा येथे महापालिकेच्या वतीने डेंगू मुक्त अभियानाचा दहावा रविवार संपन्न झाला यावेळी. आयुक्त यशवंत डांगे, मा.महापौर सुरेखाताई कदम, मा.नगरसेविका मंगल ताई लोखंडे, मनपा आरोग्य अधिकारी डॉ.अनिल बोरगे, डॉ.सृष्टी बनसोडे, डॉ.वृषाली आरु, डॉ. प्राजक्ता मुथा, पुरुषोत्तम आडेप ,अजित क्षीरसागर आदीसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मा.महापौर सुरेखाताई कदम म्हणाल्या की, नागरिकांनी आपल्या कुटुंबाची काळजी घेण्यासाठी आठवड्यातून एकदा कोरडा दिवस म्हणून पाळला पाहिजे याचबरोबर आपले घर आणि परिसर स्वच्छ ठेवण्याचे काम करावे. महापालिकेच्या माध्यमातून समाजामध्ये जनजागृती होत असून संसर्गजन्य आजार आटोक्यात आणण्यासाठी आयुक्त स्वतः रस्त्यावर उतरून नागरिकांमध्ये जाऊन जनजागृती करत नगरकरांची काळजी घेत आहे.असे त्या म्हणाल्या.

आरोग्य अधिकारी डॉ.अनिल बोरगे म्हणाले की, पावसाळ्यामध्ये संसर्गजन्य आजाराचा फैलाव मोठ्या प्रमाणात होत असून त्यावर महापालिकेच्या माध्यमातून उपयोजना म्हणून आयुक्त यशवंत डांगे यांच्या संकल्पनेतून नगर शहरात डेंगू मुक्त अभियान राबवण्यात आले. या माध्यमातून शहरातील विविध भागात जाऊन नागरिकांमध्ये जनजागृती केली. त्यामुळे मागील काही वर्षाच्या तुलनेत यावर्षी डेंगू चे रुग्ण कमी प्रमाणात आढळून आले आहे. कर्मचाऱ्यांनी केलेल्या कामाला यश आले असल्याची माहिती यावेळी त्यांनी दिली.

# मंत्री अब्दुल सत्तार यांना श्री नरेंद्र स्वामी यांचा आशीर्वाद

सिल्लोड ( प्रतिनिधी ) दि.२४, - श्री स्वामी नरेंद्राचार्य महाराज यांनी राज्याचे पणन व अल्पसंख्याक विकास मंत्री ना. अब्दुल सत्तार यांना गळ्यात हार घालून आशीर्वाद दिला. यावेळी मंत्री अब्दुल सत्तार आणि श्री स्वामी नरेंद्र महाराज यांच्यात विविध विषयांवर सविस्तर चर्चा देखील झाली.

श्रीक्षेत्र माऊली माहेर, सिमुरगव्हाण, ता. पाथरी जि. परभणी येथे अनंत श्री विभूषित जगद्गुरू रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्य महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली दोन दिवसीय समस्या मार्गदर्शन व दर्शन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास आज राज्याचे पणन, अल्पसंख्याक विकास मंत्री ना. अब्दुल सत्तार उपस्थित होते. यावेळी त्यांनी श्री स्वामी नरेंद्र महाराज यांची भेट घेवून दर्शन घेतले. याप्रसंगी ना. अब्दुल सत्तार यांनी श्री स्वामी नरेंद्राचार्य यांचा पुष्पहार देऊन सन्मान केला. श्री नरेंद्र स्वामी यांनी देखील मंत्री ना. अब्दुल सत्तार यांच्या गळ्यात पुष्पहार टाकून आशिर्वाद दिला. नरेंद्र महारांजाचे माझ्यावरील प्रेम कायम आहे. मी प्रत्येकवेळी त्यांचे दर्शन घेतो.काही दिवसांपूर्वी



श्रीक्षेत्र नानिज धाम येथे ही एका कार्यक्रमात मी हजर होतो. माऊलीच्या सावलीत ऊर्जा मिळते असे मंत्री अब्दुल सत्तार म्हणाले.

याप्रसंगी जिल्हा बँकेचे चेअरमन अर्जुन पा गाढे, माजी जि.प. अध्यक्ष श्रीराम पा महाजन,नंदकिशोर सहारे, श्रीरंग पा. साळवे, दामूअण्णा गव्हाणे, नानासाहेब रहाटे, प्रताप प्रसाद , डॉ. संजय जामकर, विशाल जाधव, प्रशांत क्षीरसागर, मच्छिन्द्र पालोदकर, रितेश जैस्वाल, सोनू जैस्वाल,अरुण शिंदे , विश्वास शिंदे आदींची उपस्थिती होती.

# अवैध सावकारी व्यवहाराबाबत ३० सप्टेंबरपर्यंत म्हणणे मांडण्याचे आवाहन

अहमदनगर दि.२४ - तालुक्यातील चिचोंडी पाटील येथील पोपट कोकाटे यांच्यासोबत अवैध सावकारीतून व्यवहार झाले असल्यास संबंधितांनी त्याबाबतच्या पुराव्यासह ३० सप्टेंबर २०२४ पर्यंत आपले म्हणणे मांडण्याचे आवाहन उपनिबंधक सहकारी संस्था शुभांगी गोंड यांनी केले आहे.

महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १६ अन्वये उपनिबंधक सहकारी संस्था, अहमदनगर यांच्या कार्यालयाच्या नियुक्त पथकाने पोपट गजानन कोकाटे यांच्या राहत्या घरी ५ सप्टेंबर, २०२४ रोजी घरझडती घेतली. या झडतीमध्ये पथकास कागदपत्र व नोंदीची रजिस्टर आढळून आले. नोंदीच्या रजिस्टरमध्ये बऱ्याच व्यक्तींची नावे आढळून आली आहेत. नमूद व्यक्तींची नावे व पत्ते उपलब्ध नसल्याने त्यांना म्हणणे मांडण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## गळफास घेऊन महिलेची आत्महत्या

वाळुज महानगर प्रतिनिधी: पंढरपूर फुलेनगर येथील प्रांजल पंढरीनाथ साळवे अठरा वर्षे हिने २१ सप्टेंबर रोजी सायंकाळी साडेचार वाजेच्या सुमारास राहत्या घरी पत्र्याच्या पाईपला साडीच्या साहाय्याने गळफास घेतला. यावेळी विशाल साळवे यांनी बेशुद्ध अवस्थेत त्यांना घाटीमध्ये उपचारासाठी दाखल केले असता डॉक्टरांनी मयत घोषित केले याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# साजापूरला नववीचा वर्ग नाकारला? ; नागरिकांसह विद्यार्थ्यांचा उपोषणाचा इशारा

वाळुज महानगर प्रतिनिधी: साजापूर येथील जिल्हा परिषद शाळेतील नववीच्या वर्गाचा प्रश्न उपस्थित झाला असून विद्यार्थ्यांनी अर्धे शिक्षण सत्र संपत असतानाच वरिष्ठांनी अगोदर प्रस्ताव पाठवा असे आवाहन केले होते आणि आता तोंडी सांगितले की करोडीला नववीचा वर्ग आहे तुम्हाला देता येणार नाही त्यामुळे येथील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात आले आहे. पालकांनी व विद्यार्थ्यांनी याच शाळेत आम्ही मुलांना शिकवू नसता जिल्हा परिषद शाळेसमोर उपोषणाला बसू असा इशारा दिला आहे.

> शाळेकडून आलेला प्रस्ताव मी वरिष्ठाकडे सादर केला आहे परंतु वरिष्ठांनी नाकारला की मंजूर केला हे मला सांगता येणार नाही त्यामुळे तुम्हाला माझ्या वरिष्ठांना बोलावं लागेल मुलांचे शैक्षणिक नुकसान न होण्यासाठी मी अगोदरच मुख्याध्यापकांना सर्व मुलांना टीसी देण्याचे सांगितले होते, त्यामुळे मुलांचे शैक्षणिक नुकसान होईल असे मला वाटत नाही.
>
> दिपाली फफाळ-थोरवे
> गटशिक्षणाधिकारी जिल्हा परिषद

> गट शिक्षणाधिकारी यांच्या आदेशानुसार मी सर्व मुलांना टीसी घेऊन जाण्याबाबत निरोप दिला होता परंतु पालकांनी शाळेत येऊन आम्हाला याच शाळेत शिकवायचे आहे त्यामुळे आम्ही टीसी घेऊन जाणार नाही अशी भूमिका घेतलेली आहे. तरीही मी काही पालकांना टीसी लिहून दिलेल्या आहेत परंतु जे विद्यार्थी टीसी घेऊन जायला तयार नाही त्यांची स्वतंत्र खोलीत नववी वर्गाची शिकवणी सुरू आहे.
>
> धनंजय नागमवाड, मुख्याध्यापक
> जिल्हा परिषद साजापूर

> आपण ज्या शाळेविषयी बोलत आहेत याविषयी मला सध्या कल्पना नाही परंतु मी सर्व कागदपत्रे तपासून शाळेने काय प्रस्ताव पाठवला होता आणि त्यावर काय निर्णय झाला हे तुम्हाला पाहून सांगतो.
>
> विकास मीना, मुख्य
> कार्यकारी अधिकारी
> जिल्हा परिषद

साजापूर येथील जिल्हा परिषद शाळेत नववी मध्ये एकूण ५० विद्यार्थी संख्या असून त्यापैकी २७ मुली व २३ मुले आहेत. तसेच बसण्यासाठी स्वतंत्र खोली ही उपलब्ध आहे .शासनाने शाळेला सांगितले होते की नववीच्या वर्गासाठी प्रस्ताव पाठवा त्यानुसार प्रस्ताव तयार करून वरिष्ठांकडे पाठवलाही होता व प्रायोगिक तत्वावर नववीचा वर्ग सुरूही करण्यात आला असून विद्यार्थी शिक्षण घेत आहेत, परंतु शैक्षणिक सत्र अर्धे होत असतानाच वरिष्ठांनी तोंडी शाळेला कळविले की करोडी हे गाव तीन किलोमीटर अंतरावर आहे त्यामुळे त्या ठिकाणी नववीचा वर्ग असल्याने तुम्हाला नववी वर्गाला मान्यता देता येणार नाही. तुमचा प्रस्ताव रद्द करण्यात येत आहे, वरिष्ठांच्या या तोंडी आदेशाने शिक्षकांची कोंडी झाली असून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार असल्याचे दिसून येत आहे.

यावेळी पालक राजू अजुरे यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले की मुलीचे शिक्षण बंद करता येणार नाही परंतु शासनाने जर ऐनवेळी निर्णय बदलला तर आम्हाला आमच्या मुलासोबत शाळेसमोर उपोषणाला बसल्याशिवाय पर्याय नाही कारण मुलीचे शिक्षण याच शाळेत आम्हाला करायचेच आहे, तसेच पालक जावेद खान पठाण यांना संपर्क साधला असता ते म्हणाले की जरी करोडीला नववीचा वर्ग असला तरी करोडीला जाण्यासाठी धुळे सोलापूर महामार्ग ओलांडून जावा लागतो. या ठिकाणी दररोज अपघात होत असतात तसेच साजापूर ते करोडी हा मार्ग निर्मनुष्य असल्यामुळे आमच्या मुलींना त्या ठिकाणी कसे पाठवायचे असा प्रतिप्रश्न केला तर मुलीच्या शिक्षणासाठी व साजापूरच्या जिल्हा परिषद शाळेमध्ये नववीच्या वर्गाची मान्यता मिळवण्यासाठी आम्ही उपोषणाला बसू असे सांगीतले.


याविषयी शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण यांना वारंवार संपर्क साधला असता त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही त्यामुळे त्यांची प्रतिक्रिया कळू शकली नाही.

# अहमदनगर मर्चंटस बँकेची ५२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत संपन्न

## सभासदांना १५ टक्के लाभांश: चेअरमन हस्तीमलजी मुनोत

नगर: सुवर्णमहोत्सवी वर्ष पूर्ण करणारी अहमदनगर मर्चंटस बँक एक मोठी आर्थिक संस्था असून नगरच्या आर्थिक विकासात बँकेचे महत्वपूर्ण योगदान राहिले आहे. सभासद, खातेदार, ठेवीदारांचा विश्वास आणि सर्व तत्कालीन व विद्यमान संचालक, अधिकारी, कर्मचारी यांच्या एकत्रित प्रयत्नाने बँक उंचीवर पोहोचली आहे. अनेक आव्हानांना सामोरे जात बँकेने उत्कृष्ट कारभाराची परंपरा जपली आहे. त्यामुळेच चालू आर्थिक वर्षात सभासदांना १५ टक्के लाभांश देण्याचा ठराव केला आहे. बँकेला श्येडुल्ड बँकेचा दर्जा मिळण्यासाठीही रिझर्व्ह बँकेकडे प्रस्ताव दाखल करण्यात येईल, अशी माहिती मर्चंटस बँकेचे संस्थापक व विद्यमान चेअरमन हस्तीमलजी मुनोत यांनी दिली.

अहमदनगर मर्चंटस बँकेची ५२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा केशर गुलाब मंगल कार्यालय येथे बँकेचे संस्थापक व विद्यमान चेअरमन हस्तीमलजी मुनोत यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीत पार पडली. यावेळी व्हा. चेअरमन अमित मुथा, संचालक अनिल पोखरणा, आनंदराम मुनोत, संजय बोरा, किशोर गांधी, सी.ए.आयपी अजय मुथा, सी.ए.मोहन बरमेचा, संजय चोपडा , किशोर मुनोत, सुभाष बायड, मिनाताई मुनोत, विजय कोथिंबीरे, सुभाष भांड, कर्मचारी प्रतिनिधी जितेंद्र बोरा, प्रसाद गांधी, बोर्ड ऑफ मॅनेजमेंट सदस्य राजेश झंवर, पेमराज बोथरा, सी.ए.प्रविण कटारिया, मुख्य कार्यकारी



अधिकारी सुनिल पुराणिक आदींसह सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रारंभी मुख्य कार्यकारी अधिकारी सुनील पुराणिक यांनी अहवाल वाचन केले व विषयपत्रिकेवरील विषयांची माहिती दिली. चेअरमन हस्तीमलजी मुनोत पुढे म्हणाले, सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात बँकेला ३० कोटी ३१ लाखांचा ढोबळ नफा झालेला आहे. आवश्यक तरतुदी वजा करून निव्वळ नफा ६ कोटी ३ लाख रुपये इतका मिळाला. कर्जावरील व्याजात बँकेने अहवाल वर्षात २५ कोटी १६ लाख रुपये रिबेट दिला असून रिबेटच्या रकमेचे उत्पन्नाशी शेकडा प्रमाण २३.४६ टक्के इतके आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात रिबेट देऊनही बँकेस चांगला नफा झाला आहे. बँकेच्या एकूण कर्जदारांपैकी ७५.९५ टक्के कर्जदारांनी रिबेटचा फायदा घेतला आहे.

लॉकडाऊन सारख्या आपत्तीमुळे दीर्घ काळ व्यापारी, सर्वसामान्यांना अडचणीचा सामना करावा लागला. याही परिस्थितीत व्यापाराला, अर्थकारणाला चालना देण्यासाठी बँकेने त्या कालावधीत कर्जावरील व्याजदर कमी केले होते. त्याचा मोठा फायदा व्यापारी, कारखानदार व इतर कर्जदारांना झाला आणि आजही कर्जावरील व्याज दर इतर बँकांच्या तुलनेत कमीच आहे. ३१ मार्च २०२४ अखेर बँकेकडे राखीव व इतर निधी २१५ कोटी ८० लाख रुपये असून बँक भक्कम आर्थिक पायावर उभी आहे. सध्या व्यापारी बँकांचा चेहरा बदलत आहे. त्यामुळे मर्चंटस बँक अत्याधुनिक डिजिटल बँकिंग सेवा उपलब्ध करून देत आहे. खातेदारांना त्यांचे पासबुक प्रिंट करून घेण्यासाठी पासबुक किऑस्क मशीनची सुविधा ४ शाखांमध्ये सुरू करण्यात आली आहे. तसेच येत्या काळात सर्वच शाखांमध्ये ही सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. ही सुविधा खातेदारांना २४ बाय ७ मिळेल. ज्या खातेदारांनी खात्यास स्वतःचे ईमेल आयडी रजिस्टर केले आहेत त्यांना दरमहा त्यांच्या ईमेलवर त्यांच्या खात्याचे ई स्टेटमेंट पाठवले जाते. ज्या ग्राहकांनी ईमेल व मोबाईल नंबर रजिस्टर केले नाहीत, त्यांनी नजीकच्या शाखेत जाऊन रजिस्ट्रेशन करावे. बँकेच्या चितळे रोड शाखेत सध्या कॅश डिपॉझिट मशीन कार्यान्वित झाले आहे. लवकरच दाळमंडई व मार्केट यार्ड शाखेत कॅश डिपॉझिट मशीन बसवण्यात येणार आहे तसेच लवकरच तारकपूर व एमआयडीसी शाखेत एटीएम मशीन सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त सभासदांना संस्मरणीय भेट देण्याचाही मानस आहे. सर्वांच्या सहकार्याने बँकेची प्रगतीची घोडदौड अशीच कायम राहिल असा विश्वास चेअरमन हस्तीमलजी मुनोत यांनी व्यक्त केला.

यावेळी सभासद राजेंद्र चोपडा आणि महावीर पोखरणा यांनी उपस्थित केलेल्या विविध प्रश्नांना चेअरमन हस्तीमलजी मुनोत, सी.ए.,आयपी अजय मुथा यांनी सर्व तांत्रिक व कायदेशीर बाबी विस्तृतपणे सांगून समर्पक व सडेतोड उत्तरे देत बँकेची आर्थिक स्थिती भक्कम असल्याचे निदर्शनास आणून दिले. या उत्तरांबद्दल सर्व उपस्थित सभासदांनी समाधान व्यक्त करीत बँकेचे संचालक मंडळ, अधिकारी, कर्मचारी व एकूणच चांगल्या कारभारावर विश्वास व्यक्त केला.

विषय पत्रिकेवरील सर्व विषयांना एकमताने मंजूरी देण्यात आली. शेवटी व्हाईस चेअरमन अमित मुथा यांनी आभार मानले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# तेरणा कारखाना २५ वर्षानंतर देखील शेतकऱ्यांच्याच मालकीचा राहणार : मंत्री प्रा.डॉ.तानाजीराव सावंत

## भैरवनाथ शुगर हा कारखाना विकत घेणार नाही; केंद्राच्या विचाराचे सरकार राज्यात निवडून द्यावे

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ सप्टेंबर -**

राज्याचे सहकार मंत्री कोळसे पाटील यांनी राज्यातील ज्या सहकारी कारखान्याकडे कर्ज आहे ते कर्ज वसूल करण्यासाठी कारखाने विकावी लागतील असा निर्णय घेतला. कर्ज हा भाग वेगळा असून आम्ही भैरवनाथ शुगरच्या माध्यमातून हा कारखाना फक्त २५ वर्ष भाडेतत्त्वावर चालविण्यासाठी घेतलेला आहे. करार संपल्यानंतर या कारखान्यावर भैरवनाथ शुगर चा कुठलाही हक्क व अधिकार राहणार नाही. तो हक्क आणि अधिकार फक्त आणि फक्त या कारखान्याच्या सभासद असलेल्या शेतकऱ्यांचाच राहणार असल्याची ठाम ग्वाही राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री प्रा डॉ.तानाजीराव सावंत यांनी आई तुळजाभवानीची शपथ घेऊन उपस्थित जनसमुदायास दि.२४ सप्टेंबर रोजी दिली.



दरम्यान, या कारखान्याच्या १०० किलो मीटर परिसरात असलेले साखर कारखाने जो उसाला दर देतील त्यापेक्षा हा कारखाना ५१ रुपये जास्ती दर देणार असल्याचे आश्वासन हे त्यांनी दिले.

धाराशिव तालुक्यातील ढोकी येथील भैरवनाथ शुगर वर्कस युनिट ६ संचलित तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना गेटसमोरील मैदानावर तेरणा परिवार सभासद व ऊस उत्पादक शेतकरी स्नेह संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख अनिल खोचरे, तेरणा कारखान्याचे कार्यकारी संचालक केशव सावंत, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत, जिल्हाप्रमुख दत्ता सांळुके, सुरज साळुंके, ढोकीचे सरपंच आमोल समुद्रे, धाराशिव शिवसेना तालुकाप्रमुख अजित लाकाळ, संदीप मडके, नितीन लांडगे, अविनाश खापे, उपजिल्हाप्रमुख अनंत वाघमारे, लक्ष्मण हुलजते, आण्णासाहेब जाधव, गणेश जगताप, संतोष जगदाळे, अजित खोत, ईश्वर शिंदे, अनिल माने, दत्ता तिवारी, भारती गायकवाड, तेरणा बचाव संघर्ष समितीचे अध्यक्ष राहुल वाकुरे आदींसह मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना ना. प्रा डॉ सावंत म्हणाले की, लोकसभा निवडणुकीच्या प्रचार दरम्यान पुन्हा मोदी सरकारला निवडून दिले तर ते भारतीय राज्यघटना बदलणार असा विरोधकांनी अपप्रचार केला. त्याला बळी पडून नागरिकांनी जिल्ह्यात विरोधी पक्षाचा खासदार केला. मात्र भाजप व मित्र पक्षांच्या उमेदवाराचा पराभव केला.

राज्यात रेल्वे, रस्ते व इतर विकास कामे सुरू आहेत त्यासाठी निधीदेखील उपलब्ध करून दिला जात आहे. मात्र राज्यात जर विरोधकांचे सरकार निवडून दिले तर ती कामे पुन्हा खोळंबतील असे सांगत राज्यात शिंदे व फडणवीस यांच्या विचाराचे सरकार आणणे गरजेचे आहे. कारण केंद्रामध्ये महायुतीचे सरकार स्थापन झाले असून राज्यात देखील महायुतीचे सरकार आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये पुन्हा निवडून द्यावे असे आवाहन केले. महाराष्ट्रात सर्व जाती-धर्माचे लोक छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून गुण्यागोविंदाने एकत्र राहत आहेत. मात्र, विरोधक अफवा पसरवण्यामध्ये यशस्वी होत असून एक चिंगारी सुद्धा संपूर्ण देशाला आग लावू शकते. त्यामुळे अशा अफवांवर कोणीही विश्वास ठेवू नये अशी आवाहन त्यांनी केले. तसेच तेरणा साखर कारखाना हा मराठवाड्यातील सहकार क्षेत्रातील पहिला कारखाना शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी उभारला. मात्र त्याची राख रांगोळी कोणी केली? असा प्रश्न विचारीत कारखान्याचे वाटोळे केले असल्याचा गंभीर आरोपही त्यांनी केला.

विशेष म्हणजे इथल्या नेते मंडळीच्या मनात पाप नसते तर हा कारखाना भैरवनाथ शुगरने चालविण्यासाठी घेतल्यानंतर ते कोर्टामध्ये गेले नसते असा टोलाही त्यांनी लगावला. हा कारखाना ३६ हजार शेतकऱ्यांचा असून कोणाच्या बापाचा नाही असे सांगत दुसऱ्याच्या घरावर



विस्तव फिरवायचा आणि स्वतः ची घरे भरायची असले धंदे बंद करा असा इशारा त्यांनी दिला. तसेच हा उद्योग यापुढे कोणीही खपवून घेऊ नये. तसेच यापुढे तुमच्याकडे कोणी मते मागायला आला तर शेतकऱ्यांनी तुम्ही आमच्यासाठी काय केले हे ठणकावून विचारावे असे आवाहन त्यांनी केले. विकासाच्या गप्पा मारण्यात येथील राजकीय नेते मंडळी तरबेज असून फक्त फेसबुक लाईव्हवर उजनीचे पाणी आले म्हणून नारळ फोडण्याच्या कामात मग्न असल्याची खरमरीत टीकाही त्यांनी केली.

विकास काय असतो? हे भूम, वाशी व परांडा या भागात येऊन बघा असे सांगत या भागाच्या विकासासाठी दीड हजार कोटींचा निधी आणला असून राज्यातील कोणत्या लोकप्रतिनिधीने आपल्या मतदारसंघासाठी असा निधी आणला आहे का? असा थेट प्रश्न विचारला. तर कोल्हापुरी पद्धतीचे बंधारे कशासाठी बांधलेले आहेत? त्याचे सर्व दरवाजे चोरीला गेले असून फायबर दरवाजे बसविण्यास का विरोध करीत आहेत? असे सांगत लोखंडी दरवाजे तयार करणारे ठेकेदार त्यांचे, चोरी करणारे चोरांची टीम त्यांची असल्याचा थेट हल्ला त्यांनी चढविला.

या सरकारने मुख्यमंत्री लाडकी माझी बहीण, शेतकऱ्यांना वीज मोफत यासारखे अनेक लोकोपयोगी निर्णय घेतले असून एकाही शेतकऱ्याला शेतातील लाईटचे बिल दिले तर ते मला आणून द्या, त्या अधिकाऱ्याचे काय करायचे ते तुम्ही माझ्यावर सोडून द्या असे त्यांनी सांगितले. विशेष म्हणजे निजामापासून अन्याय सहन करण्याची या भागातील नागरिकांना सवय झाली आहे. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. या कार्यक्रमास ऊस उत्पादक शेतकरी, तेरणा कारखान्याचे सभासद, महिला व पुरुष तसेच शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मंत्री सावंत यांचे वारकऱ्यांनी केले स्वागत!

मंत्री प्रा.डॉ.सावंत यांचे आगमन झाल्यानंतर तालुका वारकरी साहित्य परिषदेच्यावतीने तालुकाध्यक्ष आप्पासाहेब वाघुलकर यांच्यासह भजनी मंडळांनी त्यांचे टाळ मृदुंग व पालखी मिरवणूक काढत वाजत गाजत स्वागत केले. भजनी मंडळ टाकळी बेंबळीच्या अन्नपूर्णा शेंद्रे, सुकुमार कंजे, कलावती राठोड, छाया तौर, रुक्मीन मोरे, रुक्मिणी नरवडे, विजाबाई सोनटक्के, पार्वती, गुणाबाई पांढरे, धाराशिव (शांतिनिकेतन) येथील संत जनाबाई भजनी मंडळाच्या शोभाताई लंगडे, कल्पना सुतार, प्रभावती भिंगडे, शितल माने यांच्यासह इतर सहभागी झाले होते.



## पालकमंत्री प्रा.डॉ.तानाजीराव सावंत यांच्या हस्ते बैठक हॉलचे उद्घाटन

**धाराशिव, दि.२४ सप्टेंबर -**

जिल्हाधिकारी कार्यालय येथील बैठक हॉलचे नुतनीकरण करण्यात आले आहे. नुतनीकरण करण्यात आलेल्या या बैठक हॉलचे उद्घाटन आरोग्यमंत्री तथा पालकमंत्री प्रा.डॉ.तानाजीराव सावंत यांच्या हस्ते आज २४ सप्टेंबर रोजी करण्यात आले.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओम्बासे,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष, अपर जिल्हाधिकारी शिरीष यादव, निवासी उपजिल्हाधिकारी शोभा यादव, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतीश हरदास, जि.प.माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत, शिवसेना जिल्हा प्रमुख दत्ता साळूंखे, सुरज साळूंके, अनिल खोचरे, जाकीर सौदागर आदी उपस्थित होते.


## प्रतिक्षा पवार यांचा वाढदिवस विविध उपक्रमाने साजरा

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२४ सप्टेंबर -**

बदलत्या काळानुसार कार्यक्रमाचे सोशल मीडियामुळे स्वरूप बदलत चालले आहे. कोणत्याही कार्यक्रमाचे फोटो टाकण्याची स्पर्धाच लागली आहे. पण काहीजण मात्र सामाजिक भान जपत वाढदिवस साजरा करताना दिसत आहेत.

करांजकल्ला येथील सरपंच विशाल पवार हे मात्र कुटुंबातील वाढदिवस मात्र वेगळ्या पद्धतीने साजरा करतात. विशाल पवार हे उच्चशिक्षित असून त्यांना धडपड्या युवा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या पत्नी प्रतिक्षा पवार यांचा वाढदिवस मतिमंद, विकलांग मुलांना खाऊ, शैक्षणिक साहित्य वाटप करून त्यांच्यासोबत साजरा करण्यात आला यावेळी महेश इटकर, शेतकरी निलेश कांबळे, जाधव उपस्थित होते.

## वाशी येथे पावसामुळे शेतकऱ्यांचे नुकसान!



**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२४ सप्टेंबर -**

वाशी शहरात २२ सप्टेंबर रोजी २८ मिली पाऊस झाला. त्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतात पाणीच पाणी साचले गेले. वाशी येथील वसंत कवडे हे शेतकरी तर शेतात साचलेल्या पाण्यात सोयाबीन काढत होते. सोयाबीन नाही काढले तर ते वाळले असल्याने थोड्या उन्हात फुटून जमिनीवर गळू लागतात.

पाण्यात सोयाबीन जाऊ नये म्हणून शेतकरी वर्ग पावसात सोयाबीन कापून कोरड्या जागेवर ठेवून देतात. व थोडे सुकल्यानंतर ते ताडपत्रीने झाकतात. अशाप्रकारे शेतकऱ्यांच्या शेतात उद्योग चालू आहे.

सोयाबीन काढण्यासाठी दुसरीकडे मजूर मोठ्या प्रमाणात आले असून ते साडेचार हजार ते पाच हजार एकरी भाव घेत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांची दोन्ही कडून कोंडी झाली आहे. सोयाबीन नाही काढावा तर पावसाने नुकसान होत आहे. जर काढायचे म्हटले तर मजुरी जास्त आहे. त्यामुळे शेतकरी वर्ग मेटाकुटीस आला आहे.

सध्या सोयाबीनचा भाव ही फार कमी असून ४ हजार २०० रु क्विंटल ने जात आहे. एकंदरीत शेतकऱ्यांची चोहोश बाजूने आडवणूक चालू आहे. वाशी येथे आतापर्यंत ७९७ मिली पाऊस झाला असून सध्या ही दररोज पाऊस थोडा थोडा येत आहे. त्यामुळे शेतकरी वर्ग मेटाकुटीस आला आहे. शासनाने त्वरित गोडाऊन चालू करून सोयाबीन खरेदी चालू करावी, अशी ही शेतकऱ्यांची मागणी आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### भाषा आणि साहित्य आपणास जीवनामध्ये समृद्ध बनवते: प्रा.डॉ.नयन

**वाशी, दि.२४ सप्टेंबर -**

कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय वाशी येथे हिंदी दिवस पंधरवाड्यानिमित्त राष्ट्रीय हिंदी दिनाचे औचित्य साधून व्यख्यानाचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रमुख म्हणून जी.के जोशी वाणिज्य महाविद्यालय लातूर येथील हिंदी विभागाच्या प्रा.डॉ नयन भादुले (राजमाने) कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अरुण गंभीरे,एम.एस बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालय लातूर चे प्रा.महेश सोमनाथ राजमाने, वैदेही अरुण गंभीरे, सावित्री राम जाधव उपस्थित होते. यावेळी प्रा.डॉ.नयन भादुले (राजमाने) म्हणाल्या कि, भाषा किंवा साहित्य आपणाला समृद्ध बनवते जीवनामध्ये योग्य मार्गावर मार्गक्रमण करण्यासाठी पुस्तकाचे वाचन करणे महत्वाचे असते महाविद्यालयामध्ये तुमच्यातील विविध गुणांना विकसित केले जाते. तसेच हिंदी हि भाषांतरामुळे रोजगाराची भाषा समजली जाते असे त्या म्हणाल्या. प्रास्ताविक प्रा.एन.पी झेंडे यांनी प्रमुख पाहुणे परिचय प्रा.ए.एसचिंचोलकर यांनी तर सूत्रसंचालन प्रा.ए.सीपाटील यांनी आणि प्रा.एस.एसखटींग यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्वप्नील शेलकांदे, चंद्रकांत घाडगे व दत्ता निकम यांनी परिश्रम घेतले.

### वागदरीत अनिकेत याचा सत्कार

**जळकोट, दि.२४ सप्टेंबर -**



एस.टी महामंडळात अत्यंत इमानदारीने चालक म्हणून कार्यरत असलेले संजय नरसिंह बिराजदार यांचे चिरंजीव अनिकेत संजय बिराजदार यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेऊन ऑल इंडिया रँकमधून गुलबर्गा येथे बीएएमएस वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमला प्रवेश घेतल्याबद्दल त्यांचा ग्रामपंचायत कार्यालय, वागदरीच्या वतीने सरपंच तेजाबाई शिवाजी मिटकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी उपसरपंच सुरेखा भालचंद्र यादव, ग्रा.पं.सदस्य ज्ञानेश्वर पाटील,गुणाबाई बनसोडे, जेष्ठ कार्यकर्ते शिवाजी मिटकर, ह.भ.प.सुरेशसिंग परिहार, राजकुमार पाटील, महादेव बिराजदार, किशोर सूरवसे, जितेंद्र पाटील, संजय बिराजदार, एस.के.गायकवाड, किशोर धुमाळ, सुधाकर बिराजदार ग्रामस्थ उपस्थित होते.

# मधुकरराव चव्हाण यांच्यामुळे फिरणार इच्छूकांच्या इच्छेवर पाणी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२४ सप्टेंबर -**

तुळजापुर विधानसभा मतदार संघात विधानसभा निवडणुक लढविण्यासाठी यावेळी अनेकजण इच्छुक असल्याने या मतदार संघात बहुरंगी लढत होण्याची शक्यता आहे. राज्याचे माजी मंत्री व काँग्रेसचे जेष्ठ नेते मधुकरराव चव्हाण हे पुन्हा विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात पुर्ण ताकदीने उतरल्यामुळे महाविकास आघाडीकडुन निवडणुक लढविण्यासाठी ज्यांनी प्रयत्न सुरु केले होते. त्यांच्यामध्ये निराशा पसरली आहे.

तुळजापुर विधानसभा निवडणुक यावेळी देखील २०१९ च्या निवडणुकीप्रमाणे चुरशीची होणार असल्याचे दिसुन येत आहे. या मतदार संघाचा इतिहास पहिला तर २०१९ ची विधानसभा निवडणुक वगळता प्रत्येक निवडणुकीत या मतदार संघातुन धोतरवला उमेदवारच निवडुन आला आहे. २०१९ पर्यंत या मतदार संघात कै. साहेबराव पाटील हंगरगेकर, शिवाजीराव पाटील बभाळगावकर, माणिकराव खपले, सिद्रामप्पा आलुरे गुरुजी, आणि मधुकरराव चव्हाण हे निवडुन आले आहेत. विशेष म्हणजे हे सर्वजण धोतर परीधान करणारेच होते. मात्र २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत या मतदार संघाचे भाजपचे विद्यमान आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी मधुकरराव चव्हाण यांचा पराभव करून या मतदार संघात धोतरवाला निवडुन येण्याची परंपरा खंडीत केली. या मतदार संघात सलग चार वेळा आणि एकुण पाचवेळा निवडुन येण्याची किमया काँग्रेसचे जेष्ठ नेते मधुकरराव चव्हाण यांनी केली आहे, शिवाजीराव पाटील बाभाळगावकर दोन वेळेस तर माणिकराव खपले तीनवेळेस या मतदार संघातुन निवडुन आले आहेत. हा मतदार संघ काँग्रेसचा गड म्हणुन ओळखला जात होता. मात्र २०१९ साली आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी काँग्रेसचा हा गड उध्वस्त करीत पहिल्यांदा या मतदारा संघात भाजपचा झेंडा फडकविला आहे.



गेल्या पाच वर्षात आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी तुळजापुर विधानसभा मतदार संघात मोठ्या प्रमाणात विकासकामे केली आहेत आजही या मतदार संघात त्यांच्या प्रयत्नातुन कोट्यावधी रुपये खर्चाची महत्वपुर्ण विकासकामे सुरु आहेत. गेल्या अनेक वर्षांपासुन नळदुर्ग शहरात पाण्याचा प्रश्न अतिशय बिकट होता. बोरी धरण पाण्याने तुडुंब भरलेले असतानाही नळदुर्गकरांना आठ ते दहा दिवसाआड पाणी मिळत होते. अनेकांनी पाण्याचा हा प्रश्न सोडविण्याच्या फक्त वलगनाच केल्या मात्र एकाही नेत्यांना नळदुर्गकरांचा हा महत्वाचा प्रश्न सोडविला नाही मात्र आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी हा प्रश्न सोडविला असुन सध्या ४६ कोटी रुपये खर्चाच्या नळदुर्ग पाणीपुरवठा योजनेचे काम सुरु आहे. हे काम पुर्ण झाल्यानंतर आता नळदुर्ग करांना दररोज पाणी मिळणार आहे.

त्याचबरोबर नळदुर्ग शहरात आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या प्रयत्नामुळे अप्पर तहसिल कार्यालय मंजुर झाले आहे. या सर्व कामांचा फायदा येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत आमदार राणा जगजितसिंह पाटील यांना नक्की होणार यात शंका नाही. फक्त भाजपाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी प्रामाणिकपणे काम करून या कामांची माहिती नागरीकांपर्यंत पोहचविणे गरजेचे आहे.

या मतदार संघात आमदार राणा जगजितसिंह पाटील, माजी आमदार मधुकरराव चव्हाण, देवानंद रोचाकरी, अशोक जगदाळे, आण्णासाहेब दराडे, डॉ. स्नेहा सोनकाटे, ऍड. धीरज पाटील यांच्यासह कांहीजण इच्छुक आहेत. यातील कांही मंडळींना विधानसभा निवडणुक आली की मगच तालुक्यातील जनतेची आठवण येते. इतरवेळी मात्र ही मंडळी कुठल्या बिळात जाऊन बसतात हे समजत नाही. आज अनेकजण या निवडणुकीची जय्यत तयारी करत आहेत. अनेक कार्यक्रमांच्या माध्यमातुन, मतदारांच्या गाठीभेटी घेऊन आपण विधानसभा निवडणुक लढविणार असल्याचे सांगत आहेत.

सध्या या मतदार संघात महाविकास आघाडीचे नेते अशोक जगदाळे, माजी आमदार मधुकरराव चव्हाण, देवानंद रोचकरी, आण्णासाहेब दराडे, ॲड. धीरज पाटील, डॉ. स्नेहा सोनकाटे या गावागावात बैठका घेऊन मतदारांशी विविध प्रश्नांवर चर्चा करून आपली बाजु मतदारांसमोर मांडत आहेत. यामध्ये आण्णासाहेब दराडे यांनी तर कमालच केली आहे. ना राजकीय गॉडफादर,ना राजकीय कुठली पार्श्वभुमी नसताना त्यांनी प्रचारात जी आघाडी घेतली आहे आणि त्यांना जो मतदारांचा प्रतिसाद मिळत आहे याबद्दल त्यांचे कौतुक करावे लागेल.

या मतदार संघात यावेळी बहुरंगी लढत होण्याची शक्यता आहे.कारण कुणीच माघार घ्यायला आज तयार नाही. काँग्रेसचे जेष्ठ नेते मधुकरराव चव्हाण यांनी पुन्हा एकदा मीच विधानसभा निवडणुक लढविणार असल्याचे जाहीर केल्याने महाविकास आघाडीकडुन निवडणुक लढविण्याची जय्यत तयारी करीत असलेले महाविकास आघाडीचे नेते अशोक जगदाळे आणि काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ऍड. धीरज पाटील यांची मात्र यामुळे मोठी गोची झाली आहे. हा मतदार संघ महाविकास आघाडीमध्ये काँग्रेसकडे आहे हे विसरून चालणार नाही. त्यामुळे येणाऱ्या कांही दिवसात या मतदार संघात अनेक राजकीय घडामोडी घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.


### जाहीरनामा

**उमरगा येथील सौ.एम.पी. मथुरे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, उमरगा**

**किरकोळ अर्ज क्र. २९४/२०२४ सुजाता / निरंक नि.क.७**

ज्यापेक्षा मयत कै. पंडीत बसण्णा कनमुसे हे मौजे कसगी ता.उमरगा जि. धाराशिव येथे दि. १३/११/२००२ रोजी मयत झाले असुन अर्जदार क. १. सुजाता पंडीत कनमुसे वय ४८ वर्षे रा. कसगी ता.उमरगा २. राजश्री पंडीत कनमुसे वय २८ वर्षे ३. राजेश पंडीत कनमुसे वय २६ वर्षे ४. राकेश पंडीत कनमुसे वय २४ वर्षे वरील मयताचे वारस असल्याच्या नात्याने त्यांचे पश्चात शासकीय निमशासकीय कार्यालयीन कामकाजाकरिता वारसा प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार मयताचे वारसदार असल्याबाबत आक्षेप असल्यास या जाहीरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यांत येते की जर सदर मुदतीत कोणी योग्य त्या हरकती दाखल न केल्यास अर्जदाराच्या वारसा प्रमाणपत्र मिळाल्याच्या मागणीबददल पुरावा घेवुन त्याची कै. पंडीत बसण्णा कनमुसे यांचे वारस असल्याबददलचे वारस प्रमाणपत्र हे न्यायालय वरील अर्जदारांना देईल.

**दिनांक २८/०८/२०२४**
**पुढील तारीख ०२/०९/२०२४**

**स्वाक्षरित/-**
**(बी.एस.घोडके)**
**कनिष्ठ लिपीक**

**स्वाक्षरित/-**
**(बी.व्ही जाधव)**
**सहा. अधिक्षक**

**सह दिवाणी न्यायाधीश, क स्तर, उमरगा**

### जाहीरनामा

**उमरगा येथील सौ.एम.पी. मथुरे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, उमरगा**

**किरकोळ अर्ज क.३१२/२०२४ व्यकंट/ निरंक. नि.क.७**

ज्यापेक्षा मयत कै.नरसिंग व्यकंट धानुरे हे मौजे. नळदुर्ग ता. तुळजापुर जि. धाराशिव येथे दि. २४/०४/२०२४ रोजी मयत झाले असुन अर्जदार क. १. व्यकंट दत्तात्रय धानुरे वय ५४ वर्षे रा. तुरोरी ता.उमरगा २. निकिता नरसिंग धानुरे वय २१ वर्षे ३. धनश्री नरसिंग धानुरे वय ११ महिने ४. सुवर्णा व्यकंट धानुरे वय ५० वर्षे वरील मयताचे वारस असल्याच्या नात्याने त्यांचे पश्चात शासकीय निमशासकीय कार्यालयीन कामकाजाकरिता वारसा प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे.
त्यापेक्षा सदर अर्जदार मयताचे वारसदार असल्याबाबत आक्षेप असल्यास या जाहीरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यांत येते की जर सदर मुदतीत कोणी योग्य त्या हरकती दाखल न केल्यास अर्जदाराच्या वारसा प्रमाणपत्र मिळाल्याच्या मागणीबददल पुरावा घेवुन त्याची कै.नरसिंग व्यकंट धानुरे यांचे वारस असल्याबददलचे वारस प्रमाणपत्र हे न्यायालय वरील अर्जदारांना देईल.

**दिनांक २८/०८/२०२४**
**पुढील तारीख ०२/०९/२०२४**

**स्वाक्षरित/-**
**(बी.एस.घोडके)**
**कनिष्ठ लिपीक**

**स्वाक्षरित/-**
**(बी.व्ही जाधव)**
**सहा. अधिक्षक**

**सह दिवाणी न्यायाधीश, क स्तर, उमरगा**

### जाहिर प्रगटन

**तालुका कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार उमरगा यांचे कार्यालय (दंडणीय विभाग)**

**जा.क्र.२०२४/दंडणिय/कावि- दिनांक २/०९/२०२४**

समस्त गावकरी मौजे. उमरगा ता.उमरगा जि.धाराशिव यांना कळविण्यात येते की, या कार्यालयात अर्जदार श्री मुबीनाबेगम मस्तान बागवान उमरगा ता.उमरगा जि. धाराशिव यांनी जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत मागणी केली आहे.

जन्म झालेल्याचे नावः खर्शीद मस्तान बागवान

सदरील व्यक्तीचा मौजे. उमरगा ता. उमरगा जि. धाराशिव या ठिकाणी दि. ०९/०३/२००७ या दिवशी जन्म झाला असून प्रमाणपत्र मिळणे संबंधी सदरील कार्यालयात दिनांक. ०६/०८/२०२४ रोजी अर्ज केला आहे.

वरील जन्म बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा. आक्षेप मुदतीनंतर च्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित /-**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसिलदार उमरगा**

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# पेजर, वॉकीटॉकीच्या स्फोटामागील गूढ

अँण्ड्रॉईड आणि आयफोनसारख्या आधुनिक संपर्क तंत्रज्ञानाच्या युगात वावरत असताना संपूर्ण लेबनॉनमध्ये पेजर, वॉकीटॉकी तसेच घरातील सौरऊर्जा प्रणालींमध्ये स्फोट घडवले गेले. एखाद्या संस्थेची, सरकारी खात्याची, देशाच्या संरक्षण प्रणालीची वेबसाईट हॅक करून गोपनीय माहिती हस्तगत केली जाते तसेच पेजर प्रणालीचा ताबा घेऊन हे स्फोट घडवून आणले गेले, त्यामुळे संपूर्ण जग हादरले आहे. १२ मार्च १९९३ या दिवशी मुंबई महानगरात वर्दळीच्या ११ ठिकाणी झालेले साखळी बॉम्बस्फोट आज आठवतात. एकाच वेळी एकाच शहरात झालेल्या अनेक स्फोटांनी अख्खा देश हादरून गेला होता. अतिरेक्यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन; जेवणाच्या डब्यात बॉम्ब ठेवून; टायमरने घडवून आणलेले हे स्फोट आपण समजू शकतो, एक वेळ शत्रुराष्ट्राच्या जमिनीवरून केलेले रॉकेट हल्ले हे आपण समजू शकतो, पण अॅण्ड्रॉईड आणि आयफोनसारख्या आधुनिक संपर्क तंत्रज्ञानाच्या युगात वावरत असताना संपूर्ण लेबनॉनमध्ये पेजरसारख्या कालबाह्य डिव्हाईसद्वारे, वॉकीटॉकीद्वारे शेकडो साखळी स्फोट घडवून आणले गेले, हे अनाकलनीय आहे. त्यावर कडी म्हणजे बैरूतच्या अनेक भागांत घरातील सौरऊर्जा प्रणालींचेही स्फोट घडवले गेले. हे स्फोट कोणी आणि कसे घडवून आणले हा लेबनॉनसाठी अभ्यासाचा विषय असला, तरी संपूर्ण जगाच्या आणि खास करून आपल्या देशाच्या दृष्टीने हा गंभीर विषय आहे. काही तज्ज्ञांच्या मते; एखाद्या संस्थेची, एखाद्या सरकारी खात्याची तर कधी देशाच्या संरक्षण प्रणालीची कॉम्प्युटर साईट हॅक करून तिच्या कार्यक्षमतेत अडथळे आणले जातात, महत्त्वाची आणि गोपनीय माहिती हस्तगत केली जाते. त्याप्रकारे पेजर प्रणालीचा ताबा घेऊन हे स्फोट घडवून आणले असावेत. यात तथ्य असेल तर संशयाची सुई आपोआप इस्रायलची गुप्तचर संघटना मोसादकडे वळते. कारण, आज जगातील सर्वात कार्यक्षम गुप्तचर यंत्रणा म्हणून या संघटनेचे नाव घेतले जाते आणि लेबनॉनमधील 'हिजबुल्लाह' या अतिरेकी संघटनेला इस्रायलचे शत्रू मानले जाते. या संघटनेचे अतिरेकी कालबाह्य झालेल्या पेजर प्रणालीचा अजूनही वापर करतात, ही गुप्त माहिती हीच संघटना हॅक करू शकते, असे या तज्ज्ञांचे मत आहे. अवघे जग आज युद्धाच्या रणात इस्रायलचे भय बाळगून आहे. या राष्ट्राने युद्धतंत्रात तसेच शत्रूंचा सूड उगवण्याच्या बाबतीत बरीच मोठी मजल मारली आहे. तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातही इस्रायलचे नाव कौतुकाने घेतले जाते. अशा या राष्ट्राने शत्रुराष्ट्राच्या हृदयात धडकी भरेल, अशा पद्धतीने तंत्रज्ञानाचा वापर करत लष्करी कारवाया केल्या आहेत. गेल्या काही वर्षांपासून अरब राष्ट्रे अधूनमधून इस्रायलची खोड काढतात, या देशावर छोटे-मोठे हल्ले करतात. मात्र, त्यानंतर त्यांना मोठ्या हल्ल्यांना सामोरे जावे लागते. इस्रायल त्यांना नेस्तनाबूत करणारे उत्तर देतो. गेल्या वर्षी 'हमास' या अतिरेकी संघटनेने इस्रायलवर गनिमी पद्धतीने हल्ला करत अनेक नागरिकांना उचलून नेऊन गाझा पट्टी आणि अन्य प्रांतांमध्ये ओलिस ठेवले. या बदल्यात इस्रायलवर सूड उगवण्याचा त्यांचा प्रयत्न होता. मात्र, हमासला धडा शिकवण्याबरोबरच अशा कृत्यांना पाठिंबा देणाऱ्या लेबनॉनच्या हिजबुल्लाह या अतिरेकी संघटनेलाही इस्रायलने तडाखा दिला. ही संघटना आपल्या देशाचे सार्वभौमत्व धोक्यात आणत असल्याचा आरोप करत तिचे अनेक मोहरे टिपायला सुरुवात केली. आपल्या देशाविरुद्ध कट रचणाऱ्यांना धडा शिकवण्याचा एक प्रयत्न म्हणून लेबनॉनमध्ये ठरावीक लोकांकडे असलेल्या पेजर, वॉकीटॉकी किंवा सौरऊर्जा प्रणालींमध्ये स्फोट घडवून आणण्याचे थक्क करणारे कसब इस्रायलने दाखवून दिले आहे. काही तज्ज्ञांच्या मते, पेजर प्रणाली इलेक्ट्रॉनिक डिव्हाईसमार्फत चालते. रेडिओ सिग्नल्सना मेसेजमध्ये रूपांतरित करणारे तंत्रज्ञान त्यात वापरले गेले आहे. तेव्हा ती डिजिटल डिव्हाईसमार्फत चालणाऱ्या प्रणालीसारखी हॅक करणे शक्य नाही. एक गोष्ट निश्चित, हे कृत्य कोणाचेही असले तरी एकाच देशात, एकाच वेळेस पेजर, वॉकीटॉकी आणि सौरऊर्जा प्रणाली या तीन वेगवेगळ्या घटकांमधील तंत्रज्ञान वापरून मानवाने आपल्या सुविधांसाठी लावलेले शोध स्फोट घडवून आणण्यासाठी वापरले गेले. या हल्ल्यांमध्ये टार्गेट केलेली साधने अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरून बनवलेली नाहीत आणि आज त्यांचा वापरही मर्यादिपुरताच होत असलेला दिसतो. आज पेजरची आधुनिक आवृत्ती म्हणून स्मार्टफोन, आयफोन यांचे शोध लागले आहेत. आज बहुतेक व्यक्ती त्यांचा वापर करतात आणि हीच जगाच्या दृष्टीने गंभीर म्हणण्यासारखी बाब आहे. आज आपल्या देशाची लोकसंख्या १ अब्ज ४० कोटींच्या आसपास आहे. किमान ३५ टक्के लोकसंख्या ही डिजिटल डिव्हाईसमार्फत चालणाऱ्या स्मार्टफोनचा वापर करते. अशा स्मार्टफोनना टार्गेट करून ही स्मार्टफोन प्रणाली शत्रुराष्ट्र अथवा अतिरेकी संघटनांकडून अशा पद्धतीने हॅक केली गेल्यास कल्पनाही करवत नाही, अशी भयंकर हानी इथे घडवून आणली जाईल. नव्हे, काही संहारक बुद्धिजीवी या कार्याला लागलेसुद्धा असतील! आजवर भारतात आयएसआयएस, लष्कर-ए-तोयबा, हिजबुल मुजाहिद्दीनसारख्या अतिरेकी संघटनांकडून काश्मीर, दिल्ली, मुंबई, अगदी पुण्यातसुद्धा बॉम्बस्फोट केले गेले. आज अशा घटनांचे प्रमाण अगदी नगण्य झाले आहे. याचे सगळे श्रेय आपल्या गुप्तचर खात्याला जाते. कारण आपल्या हस्तकांमार्फत आणि स्मार्टफोनवर अतिरेक्यांच्या चालत असलेल्या संभाषणाद्वारे, संदेशवहनाद्वारे त्यांचे अतिरेकी मनसुबे आपले गुप्तचर खाते उधळून लावत असते. पण अलिकडच्या काळात लेबनॉनमध्ये होत असलेले साखळी बॉम्बस्फोट ही देशाच्या संरक्षण आणि गुप्तचर खात्यासाठी चिंतेची म्हणावी अशी बाब आहे. एक तर हे स्फोट करण्यामागे कोणाचा हात आहे, ते करत असताना नक्की कोणती प्रणाली वापरली गेली आणि पेजरसारख्या कालबाह्य आणि इलेक्ट्रॉनिक्स डिव्हाईसमार्फत हे कसे शक्य झाले, या गोष्टी गंभीरपणे विचार करायला लावणाऱ्या आहेत. ११ सप्टेंबर २००१ रोजी अमेरिकेच्या वर्ल्ड ट्रेड सेंटरवर हल्ला होऊन त्यांच्या दोन्ही उत्तुंग इमारती जमीनदोस्त केल्या गेल्या. त्यावेळी अतिरेक्यांना विमान चालवण्याचे प्रशिक्षण दिले गेले होते. परदेशी भूमीवर जाऊन नियोजनबद्ध पद्धतीने केले गेलेले ते हल्ले पाहून त्यावेळी दहशतवादाची खाण असलेल्या पाकिस्तानकडे असलेली अण्वस्त्रे अतिरेक्यांच्या हाती लागण्याची चिंता व्यक्त केली गेली होती. आज पुन्हा जगाला, खासकरून भारताला त्याच काळजीने ग्रासले असल्यास नवल नाही. लेबनॉनमध्ये स्फोट घडवून आणण्यासाठी वापरले गेलेले अज्ञात तंत्रज्ञान अतिरेकी आत्मसात करू शकले तर आपल्या देशाच्या सार्वजनिक मालमत्तेची आणि मानवी जीवांची अपरिमित हानी घडवून आणली जाईल आणि ते विनाशकारी तंत्रज्ञान अॅण्ड्रॉईड स्मार्टफोन, आयफोनमधील प्रणालीला हॅक करून वापरले गेल्यास सगळे जग हादरवून टाकले जाईल. कारण आजच्या आधुनिक युगात घरोघरी स्मार्टफोन वापरले जातात. या स्फोटांमागील आधुनिक तंत्रज्ञान लवकरच समोर येईल; ते अतिरेकी संघटनांपर्यंत पोहोचल्यास जगाची काय अवस्था होईल, याची कल्पनादेखील करवत नाही. दोन राष्ट्रांमधील युद्धात हॅण्डग्रेनेड, बॉम्ब, क्षेपणास्त्रे यांचा वापर केला जातो. १९३८ मध्ये संहारक अण्वस्त्रांचा शोध लागला. अनेक देश आज अण्वस्त्रसंपन्न झाले आहेत. पण, त्यांचा वापर फक्त अमेरिकेने दोन वेळा केला. आजवर ते तंत्रज्ञान वापरून कोणीही समोरच्या शत्रुराष्ट्राची अपरिमित हानी केली नाही. कारण दोन राष्ट्रांचे आपसात कसेही संबंध असले, तरी बाह्य जगाला अशा कृतीबाबत उत्तर द्यायची बांधिलकी बहुतेक राष्ट्रे पाळतात. काही राष्ट्रांनी युद्धात रासायनिक अस्त्रांचा वापर केल्याचे आरोप झाले, पण ते तथ्यहीन होते. अतिरेकी कारवायांमध्ये आरडीएक्स, टीएनटीसारखी संयुगे वापरली जातात. त्यांना प्रत्यक्ष हल्ले म्हणता येईल. त्यातून होणाऱ्या हानीची व्याप्ती ठरावीक ठिकाणापुरती मर्यादित असते. लेबनॉनमध्ये स्फोट घडवून आणताना वापरले गेलेले तंत्रज्ञान एका देशाने आपल्या शत्रू अतिरेकी संघटनेविरुद्ध वापरले, असा प्राथमिक संशय आहे. पण हेच तंत्रज्ञान हाती लागल्यास अतिरेकी संघटना त्याचा कुणाविरुद्ध वापर करतील, याची काहीच शाश्वती नाही.

## आंतरराष्ट्रीय

**वसंत गणेश काणे**

# दलाई लामा आणि शी जिनपिंग संघर्षाची नांदी!

चौदावे दलाई लामा (पूर्वाश्रमीचे तेंझिन गियात्सो) हे १४ वे व विद्यमान दलाई लामा आहेत. तिबेटी बौद्ध मतातील गेलुग्पापंथाच्या प्रमुख आचार्यांचा उल्लेख 'दलाई लामा' असा केला जातो. १७ नोव्हेंबर १९५० रोजी चौदाव्या दलाई लामांनी पदाची सूत्रे हाती घेतली. या दलाई लामांनी तिबेटी लोकांच्या हितरक्षणासाठी हयातभर कार्य केले असून १९८९ वर्षीचे शांततेसाठीचे नोबेल पारितोषिक त्यांना प्रदान करून गौरवण्यात आले आहे.

त्यांचे आई-वडील शेतकरी होते. हे कुटुंब इ. स. १९३९ मध्ये दलाई लामांच्या चौथ्या वाढदिवसानंतर आपले छोटेसे खेडेगाव सोडून ल्हासा येथे आले. दलाई लामांच्या निवडीसाठी असलेल्या विविध कसोट्या यशस्वीरीत्या पार केल्यावर २२ फेब्रुवारी १९४० रोजी पो ताला प्रासादात एका विधिपूर्वक समारंभात तेंझिन गियात्सो चौदावे दलाई लामा म्हणून आसनस्थ झाले. त्यानंतर त्यांच्या शिक्षणाला प्रारंभ झाला. त्यांचा धर्मविषयक सखोल अभ्यास सुरू असताना १९५० मध्ये चीनने तिबेटवर आक्रमण केले आणि तिबेट चीनचा भाग असल्याचे घोषित केले. त्याचवेळी तिबेटच्या राजकीय सत्तेची तोपर्यंत दलाई लामांच्या हाती असलेली सर्व सूत्रे चीनच्या हाती आली. यानंतरच्या काळात तिबेटवर चिनी राजवटीचा अनियंत्रित अंमल सुरू झाला. धाक, दडपशाही, जुलूम, जबरदस्ती, छळवणूक, पिळवणूक इत्यादी अत्याचार तिबेटच्या जनतेवर चिनी राज्यकर्त्यांकडून व लष्कराकडून होत होते. भगवान गौतम बुद्धांच्या शांतताप्रिय देशात हिंसाचार, लाठीमार, अश्रुधूर व गोळीबार या अत्याचारांनी परिसीमा गाठली. जनतेच्या सर्व प्रकारांच्या स्वातंत्र्यावर निर्बंध लादले गेले. परिणामी तिबेटीय कला, संस्कृती व परंपरा यांचा ऱ्हास होत गेला. चीनच्या वाढत्या जाचामुळे व अत्याचारामुळे सुरक्षिततेच्या कारणास्तव दलाई लामांना त्यांच्या कुटुंबीयांसह १९५९ मध्ये तिबेट सोडावे लागले. ते स्वतः भारतात शरण आले तर काही लोक नेपाळ, भूतान व इतरत्र शरण गेले. पं जवाहरलाल नेहरू आणि लामा यांची १९५९ मध्ये मसुरी येथे भेट झाली. आज जगभरातील विविध देशांमध्ये तिबेटीय माणसे निर्वासितांचं आयुष्य कंठत आहेत. त्यातील बहुतांश भारतात आहेत. हिमाचल प्रदेशातील धरमशालात दलाई लामा वास्तव्यास आहेत. येथे त्यांनी लोकशाही मूल्यांच्या तत्त्वावर तिबेटीय निर्वासितांची संसद स्थापन केली आहे. आज ही संसद किंवा निर्वासितांचे सरकार दलाई लामांच्या समर्थ मार्गदर्शनाखाली तिबेटच्या स्वातंत्र्यासाठी लढते आहे.

दलाई लामा तिबेट मुक्तीसाठी विविध शांतताप्रिय मार्गांनी झगडत आहेत, आंदोलने करीत आहेत व आपल्यावरील अन्यायाची गाथा जगासमोर हिरिरीने मांडत आहेत. जागतिक स्तरावर तिबेटची बाजू मांडण्यात ते पूर्णपणे यशस्वी झाले आहेत. याच कारणासाठी दलाई लामांच्या शांतताविषयक प्रयत्नांची दखल घेऊन त्यांना १९८९ मध्ये नोबेल पारितोषिक देण्यात आले. देश-विदेशांत धर्म, तत्त्वज्ञान, अहिंसा, जागतिक शांतता, करुणा, मानवी हक्क इत्यादी विषयांवर ते व्याख्याने देत असतात. देश-विदेशांतील अनेक विद्यापीठांनी त्यांना सन्माननीय डॉक्टरेटची पदवी देऊन गौरविले आहे तसेच विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांनी त्यांना मानचिन्हे व गौरवपत्रे दिली आहेत. आतापर्यंत त्यांनी जगभरातील ६२ देशांना भेटी दिल्या असून अनेक पुस्तके लिहिली आहेत. त्यापैकी 'फ्रीडम इन एक्झाईल' व 'माय लॅण्ड अॅण्ड माय पीपल' ही दोन त्यांची आत्मचरित्रपर पुस्तके आहेत. चीनमधील बौद्ध नेत्यांनी व तिबेटी धर्मगुरूंच्या नेत्यांनी नुकत्याच पार पडलेल्या एका सभेत असा ठराव पारित केला आहे की, दलाई लामांच्यानंतर पुनर्जन्म घेऊन पीठासीन होणाऱ्या धर्मगुरूला चिनी सरकारची मान्यता मिळणे आवश्यक आहे. हा प्रश्न आताच पुढे येण्याचे कारण असे की, दलाई लामा येत्या वर्षात आपल्यानंतरच्या वारशाबाबतची योजना जाहीर करणार आहेत. दलाई लामांचे वय सध्या ८९ वर्षे असून नव्वदीत प्रवेश करताच ते या प्रश्नाला हात घालणार आहेत. दलाई लामा आणि चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यातील येऊ घातलेल्या संघर्षाची ही नांदी आहे, असे राजकीय निरीक्षक मानतात. कारण तिबेटची धार्मिक धोरणे आणि व्यवहार चीनच्या अध्यक्षांच्या पक्षाचे विचार आणि धोरणे यांना अनुसरूनच असला पाहिजे, याबाबत चीन अतिशय आग्रही आहे. चीनचा दलाई लामांवर आरोप आहे की, ते फुटीरतावादी (सेपरेटिस्ट) आहेत. १९८० आणि २००८ मध्ये त्यांनी तिबेटमध्ये असंतोष निर्माण होईल, असा प्रयत्न केला होता. त्यांच्यानंतर तिबेटमध्ये हिंसा आणि तणाव निर्माण होण्याचा धोका आहे. दलाई लामांनी चिनी सरकारच्या पुनर्जन्माबाबतच्या निर्णयाबाबत असहमती दाखविली आहे. त्यांनी आपल्या पुनर्जन्माचा कार्यक्रमच रद्द करण्याचीही तयारी दाखविली होती. असे केल्यामुळे सध्या होत असलेला सरकारी हस्तक्षेप थांबला असता. पण त्यांच्या पुनर्जन्माचा कार्यक्रम झाला पाहिजे आणि तो चिनी कायद्यानुसारच झाला पाहिजे, यावर सरकार अडून आहे. हा विषय अतिशय संवेदनशील आणि जटिल आहे.

माझा पुनर्जन्म मीच ठरवणार, असे तिबेटचे धर्मगुरू दलाई लामा यांचा आग्रह आहे. आपला पुनर्जन्म ठरविण्याचा अधिकार चीनला नाही, असे त्यांनी एका धर्मसंसदेत स्पष्टपणे सांगितले आहे. सध्यातरी आपली प्रकृती ठणठणीत आहे, अशा स्थितीत पुनर्जन्मावर बोलणे घाईचे ठरेल, असे ते मागे एकदा म्हणालेही आहेत. चीनचे साम्यवादी सरकार तिबेटमधील बौद्ध धर्माचे प्रमुख धर्मगुरू दलाई लामा आणि पंचेन लामा यांचे अस्तित्व समाप्त करण्याच्या प्रयत्नात आहे, अशी तिबेटींची समजूत आहे. ही गंभीर बाब असल्याचे लामा म्हणतात. दलाई लामांच्या पुनर्जन्माबाबतची पत्रके त्यांच्या खाजगी कार्यालयामार्फत उपस्थित अनुयायांमध्ये चर्चेसाठी वाटण्यात आली. यावेळी तिबेटच्या आंदोलनात आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या तिबेटींसाठी विशेष प्रार्थनेचे आयोजन केले होते. पुनर्जन्म हा केवळ धार्मिक सिद्धांत नव्हे तर त्यावर जगभरातील विद्यापीठांतील मानसशास्त्रज्ञांनी त्याला ठोस आधार दिला आहे, असे मत निर्वासित तिबेट संसदेचे आचार्य यशी फुंगचूक यांनी व्यक्त केले आहे. तिबेटी बौद्ध धर्मांमध्ये ही अंधश्रद्धा मानली जात नाही तर शास्त्रीय सत्य मानले जाते.

पूर्वीच्या दलाई लामांचे मृतदेह स्तुपाच्या दफनभूमीत दफन केले गेले की त्यांचा आत्मा नवीन अस्तित्वात राहतो, असा तिबेटी लोकांचा विश्वास आहे. तिबेटी भिक्षू पारंपरिकपणे दलाई लामा यांची निवड कर्मकांडाच्या आधारे करतात. या कामासाठी त्यांना अनेक वर्षेही लागू शकतात. १४ वे दलाई लामा १९५९ वर्षीच्या तिबेटमधील अयशस्वी उठावापासून उत्तर भारतीय शहर धर्मशाला येथे निर्वासित म्हणून जीवन जगत आहेत. मध्यंतरी त्यांनी परंपरा बाजूला ठेवून उत्तराधिकारी नेमण्याची शक्यता वर्तवली होती. २०११ मध्ये त्यांनी निर्वासित तिबेट सरकारच्या उत्तराधिकारी या पदाचे राजकीय अधिकार संपवलेही आहेत. चिनी सत्ताधाऱ्यांना त्यांनी गोंधळात ठेवण्याच्या हेतूने अनेक शक्यताही मांडल्या आहेत. पहिली शक्यता अशी की, त्यांचा पुनर्जन्म मुलीच्या स्वरूपातही असू शकेल किंवा त्यांचा आत्मा मृत्यूपूर्वीही दुसऱ्या व्यक्तीच्या शरीरात पुनर्जन्म घेऊ शकेल आणि ती एक प्रौढ व्यक्तीही असू शकेल. या चित्रविचित्र संकल्पना सामान्यांच्या कल्पनाशक्तीच्या आवाक्यात नसणार म्हणून याबाबत फार विचार करू नये, हेच बरे. पण संघर्षाचे काय? तो तर आज ना उद्या होणारच!

९४२२८०४४३०

## वेध

**नितीन शिरसाट**

# भेसळमुक्त भारत अभियान आवश्यक

सद्यःस्थितीत दूध उत्पादकांच्या दुधाला बऱ्यापैकी दर मिळू लागले आहेत. अशावेळी अज्ञात ठिकाणी काही व्यक्तींकडून भेसळ केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे. जास्त दर असणाऱ्या दूध पिशव्यांमध्ये पाणी मिसळणे, इंजेक्शनने भेसळसारखे गैरप्रकार केले जातात. अशा भेसळयुक्त दुधामुळे आजार बळावतात किंवा जिवाला धोका निर्माण होऊ शकतो. या गोष्टी अतिशय गंभीर असून, त्यासंदर्भात अत्यंत कडक भूमिका घेण्याची राज्य शासनाची तयारी आहे. या अनुषंगाने आवश्यक उपाययोजना केल्या जातील, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत दिली. भारतीय समाज हा कायमच आशा-अपेक्षांच्या हिंदोळ्यावर हेलकावत राहिला आहे. अपेक्षांची पूर्ती होवो अगर न होवो रोज नवा दिवस नवी आशा याप्रमाणे तो स्वतःला ऊर्जितावस्थेत आणत असतो. कधीतरी सकारात्मक बदल घडेल अशा भोळसट व भ्रामक मानसिकतेमध्ये त्याचे जीवन रहाटगाडगे चालू असते. भारतीय जनतेच्या नैमित्तिक आहारात बहुराष्ट्रीय कंपनी विष कालवत आहे व त्याचे दुष्परिणाम, विशेषतः लहान मुलांवर होत आहेत. समाजकल्याण विभागाची वसतिगृहे तसेच आदिवासी आश्रमशाळा यामध्ये लाखो विद्यार्थी शिकत असून त्यांना सडलेले, किडलेले धान्य व भाज्या दिल्या जात आहेत. जनावरेही खाणार नाहीत असे निकृष्ट धान्य पुरवले जात आहे. ज्या कंपन्यांच्या उत्पादनावर अन्य देशांमध्ये बंदी आहे असे खाद्यपदार्थ, सौंदर्यप्रसाधने, औषधे, शेतीची औषधे, कीटकनाशके आपल्या देशात येत आहेत. अनेक वर्षे गोरगरिबांना भेसळ केलेले धान्य दिले जात आहे. यातून योग्य पोषण होत नसल्याने कुपोषितांच्या संख्येत सातत्याने वाढच होत आहे. नुकत्याच प्रकाशित झालेल्या एका ताज्या अहवालानुसार, जगभरातील कुपोषणग्रस्तांच्या यादीत भारत आघाडीवर आहे. ही बाब भूषणावह नक्कीच नाही. असुरक्षित अन्नामुळे लाखो लोकांना विविध आजार होतात आणि दरवर्षी ४ लाख २० हजार लोकांचा मृत्यू होतो, असे जागतिक आरोग्य संघटनेने (डब्ल्यूएचओ) जाहीर केले आहे. हवामानातील बदल, लोकसंख्या वाढ, नवीन तंत्रज्ञान, जागतिकीकरण आणि औद्योगिकीकरण यामुळे आमच्या असुरक्षित अन्न प्रणाली वाढत्या आजारांना तोंड देत आहेत. या अन्नामुळे होणाऱ्या मृत्यूंपैकी ७० टक्के मृत्यू पाच वर्षांखालील मुलांमध्ये होतात, असे त्यांनी उघड केले. तीन दशलक्षांहून अधिक लोक सकस आहार घेऊ शकत नाहीत म्हणून समन्वयाने प्रयत्न करण्याची गरज आहे. या जागतिक आव्हानांना तोंड देण्यासाठी अन्न नियामक समुदायाची भूमिका महत्त्वाची आहे. आंध्रप्रदेशच्या जगप्रसिद्ध तिरुपती बालाजी मंदिरातील लाडूंचा प्रसाद बनवण्यासाठी प्राण्यांची चरबी वापरली जाते, असा खळबळजनक आरोप आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी केला. त्यांच्या या आरोपामुळे संपूर्ण जगभरात एकच खळबळ उडाली. मात्र, वायएसआर पक्षाने हे आरोप फेटाळून लावले आहेत. लाडूंचा प्रसाद फक्त शुद्ध तुपापासून बनवला जातो, असे वायएसआर पक्षाचे म्हणणे आहे. या आरोप-प्रत्यारोपानंतर बालाजी मंदिरात तब्बल चार तास शुद्धीकरण करण्यात आल्याची माहिती आहे. तिरुपती बालाजीचे मंदिर पुन्हा पवित्र करण्यासाठी विधिवत् शुद्धीकरण केले जात असल्याची माहिती एका वृत्तवाहिनीने दिली आहे. या राजकीय वाचाळ प्रवृत्तीने राजकारणासह संपूर्ण देशभरात मोठी खळबळ उडाली. तिरुपती बालाजीच्या मंदिरातील लाडूंचा प्रसाद येथे दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांना दिला जातो. तब्बल ३०० वर्षांपासून ही परंपरा सुरू आहे. या लाडूंची खास गोष्ट म्हणजे ते बरेच दिवस खराब होत नाही. काही दिवस ठेवून तुम्ही ते आरामात खाऊ शकता तसेच त्याची किंमतदेखील १० ते २५ रुपयांपर्यंत आहे. म्हणूनच इथे येणारा जवळजवळ प्रत्येक जण हा प्रसाद घेऊन येतो. देशातील सर्वात श्रीमंत देवस्थान व भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या तिरुमला तिरुपती बालाजी मंदिरातील प्रसादात भेसळ असल्याचा मुद्दा चांगलाच गाजतोय्. भेसळयुक्त पदार्थांची विक्री होत असल्याचा प्रकार समोर आला आहे. सणासुदीच्या काळात मोठ्या प्रमाणात खाद्यपदार्थांची विक्री होते. याचा फायदा घेऊन अनेक व्यापारी, उत्पादक, विक्रेत्यांकडून फसवणूक होते. ही फसवणूक रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाने ठिकठिकाणी तपासणी मोहीम राबविली पाहिजे. या तपासणीत दूध, खाद्यतेल, मिठाई, रवा, कणीक, मैदा, खवा, मसाले यांच्यावर विशेष लक्ष केंद्रित करून भेसळमुक्त भारत अभियान राबविणे याला सर्वाधिक प्राधान्य देण्याची गरज आहे.

९८८१७१७८२८

## इतस्ततः

**दत्तात्रेय आंबुलकर**

# केळींची लागवड : समृद्धीचा आधारवड

देशाच्या एका कोपऱ्यातील कृषी संशोधनाचे लहान-मोठे प्रयोगही अन्य राज्यांतील शेतकऱ्यांसाठी पथदर्शी ठरत असतात. असाच एक केळींच्या लागवडीचा आणि त्याच्या उत्पादनांतून उत्पन्न निर्मितीचा आंध्रप्रदेशातील ग्रामीण स्टार्टअपचा प्रयोग प्रेरणादायी ठरावा. केळी हे फळ आपल्याकडील शेतीच्या संदर्भात परंपरागतरीत्या घेतले जाणारे पीक. संपन्न जीवनसत्त्वांसह सर्वसामान्यांना परवडणाऱ्या अशा या केळीच्या पिकाची लागवड योग्यरीत्या करणाऱ्या शेतकऱ्यांना समृद्धीचा मार्ग दाखविणारे म्हणूनही हे पीक प्रसिद्ध आहे. देश-विदेशांतून केळींवर प्रक्रिया केलेल्या उत्पादनांमुळे भारतातील शेतकऱ्यांना समृद्धी लाभली आहे. त्यासाठी ग्रामीण व कृषी स्टार्टअपमुळे केळींची शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना या फळांवरील प्रक्रियेद्वारा होणाऱ्या मूल्यवर्धनामुळे समृद्धीची वाट सापडली आहे.

शेतीमध्ये मेहनतीसह जोखीम ही असतेच व केळीच्या शेतीत ती विशेषत्वाने घ्यावी लागते. पाणी-वाऱ्यापासून हवामानातील मोठे बदल वा वादळापर्यंतच्या संकटांना केळीची शेती करणाऱ्यांना तोंड द्यावे लागते. केळीच्या शेतीपासून उत्तम उत्पादन व त्यावर प्रक्रिया करून विविध पदार्थांची निर्मिती व त्यातून प्रगत व्यवसाय केले जातात. आंध्रप्रदेशातील ग्रामीण व कृषी स्टार्टअपसह राज्याच्या केळी उत्पादन क्षेत्रातील पुलिवेंदुला केळी उत्पादन समूहाचे उदाहरण यासंदर्भात प्रामुख्याने देता येईल. पुलिवेंदुला कृषी स्टार्टअपचा मुख्य उद्देश कृषी व कृषी उत्पादन क्षेत्रातील नव्या पद्धती व तंत्रज्ञानाचा फायदा शेतकरी व कृषी उत्पादकांनी वैयक्तिक वा सहकारी पद्धतीने उपलब्ध करून शेतकऱ्यांचा सर्वांगीण विकास साधणे हा होता. यासाठी प्रयत्नांच्या पुढील टप्प्यात स्टार्टअपच्या प्रयत्नांना कृषी उत्पादनातील नवे प्रयोग, संशोधन, कृषी मालाची साठवण, वाहतूक व विक्री यांचा समावेश करण्यात आला. पुलिवेंदुला कृषी स्टार्टअपचे एक उत्साही व प्रयत्नशील असणारे संचालक स्वपन सिद्धार्थ यांचे नेतृत्व व प्रयत्न यांना प्रगतीची दिशा मिळत गेली. 'शेतीतून समृद्धी' या विकासमंत्राने प्रेरित होऊन स्वपन सिद्धार्थ व त्यांच्या सहकाऱ्यांनी आपले प्रयत्न सुरू केले. त्यामध्ये प्रामुख्याने कृषी क्षेत्रातील गरजांनुसार केळी उत्पादक शेतकऱ्यांसाठी विशेष प्रयत्नांना प्राधान्यतत्त्वावर घेण्यात आले. त्यामागे या शेती आणि शेतकऱ्यांसाठी सर्वांगीण प्रगती करण्यावर सुरुवातीपासूनच भर दिला गेला.

आपल्या प्रयत्नांच्या पाठपुराव्यासाठी स्वपन सिद्धार्थ यांनी 'आंध्रप्रदेश फूड प्रोसेसिंग सोसायटी'शी संपर्क साधला. त्यानंतर सरकारच्याच 'स्फूर्ती' म्हणजेच 'फंड फॉर रि-जनरेशन ऑफ अॅडिशनल इंडस्ट्रीज' या विशेष योजनेंतर्गत हैदराबादच्या 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मायक्रो स्मॉल अॅण्ड मीडियम इंडस्ट्रीज'कडे केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या संदर्भातील आपला प्रस्ताव मांडला. त्यांच्या या प्रस्तावाची मुख्य वैशिष्ट्ये म्हणजे, त्यामध्ये केळी उत्पादन व उत्पादकांचा समग्र व व्यावसायिकदृष्ट्या संपूर्णपणे विचार केला होता. या नव्या व नावीन्यपूर्ण प्रस्तावामुळे स्वपन सिद्धार्थ यांच्या प्रकल्प प्रस्तावाला एमएसएमई मंत्रालयातर्फे 'स्फूर्ती योजने'अंतर्गत ३.६१ कोटींचे अर्थसाहाय्य लगोलग मंजूर करण्यात आले. याशिवाय 'आंध्रप्रदेश फूड प्रोसेसिंग सोसायटी'ने १० टक्के अतिरिक्त रक्कम व त्याशिवाय केळी उत्पादकांच्या स्टार्टअपसाठी दीड कोटी रुपये मंजूर केले. प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील या राशीचा उपयोग मुख्यतः कृषी स्टार्टअपची नोंदणी-पंजीकरण, याशिवाय ग्रामीण भागातील व कृषी क्षेत्रावर आधारित स्टार्टअपला सुरुवातीचे व महत्त्वपूर्ण असे पाठबळ देण्यासाठी करण्यात आला. याच पाठबळामुळे सुरुवातीला ८२३ केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या पुलिवेंदुला केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या ग्रामीण स्टार्टअपची भक्कम सुरुवात झाली. या केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या स्टार्टअपची स्थापना आंध्रप्रदेशच्या कडप्पा जिल्ह्यात ४ ऑक्टोबर २०२३ रोजी करण्यात आली. यातूनच राज्यातील केळी उत्पादक व प्रक्रियेशी संबंधित शेतकऱ्यांना सर्वांगीण प्रगतीचा नवा मार्ग लाभला, असेच म्हणावे लागेल. केळीच्या संदर्भात 'केळीतून समृद्धी' या मूलभूत उद्दिष्टासह काम करणाऱ्या या प्रकल्पासाठी केंद्र सरकारच्या राष्ट्रीय केळी संशोधन केंद्राचे सहकार्य प्रामुख्याने घेण्यात आले. यातून केळी उत्पादक शेतकऱ्यांना अधिक संशोधन व विकासासह काम करण्यासाठी केळी संशोधन केंद्राच्या माध्यमातून मार्गदर्शनाची सोय झाली व शेतकऱ्यांच्या मोठ्या प्रलंबित समस्येचे निराकरण झाले. केळी संशोधन केंद्राच्या सहकार्याने पुलिवेंदुला केळी उत्पादक कृषी केंद्राच्या माध्यमातून व ग्रामीण स्टार्टअप मुद्यांचा उल्लेख करता येईल.

**संशोधन व विक्री** : परंपरागतरीत्या शेतकरी अथवा त्यांच्या संस्थांच्या माध्यमातून केळींची विक्री करण्याच्या जोडीलाच केळींच्या इतर प्रकारांचा संशोधनाअंती शोध घेण्यात आला. सुरुवातीला वाळवलेल्या व कोरड्या केळींच्या विक्रीची सुरुवात करण्यात आली. अशी सुकलेली केळी विशेषतः दुर्गम भागात काम करणाऱ्या सैन्य दलातील शिपायांसाठी विशेष उपयुक्त ठरली. यातूनच पुढे वाळलेल्या केळींना मधाच्या आवरणाचा प्रयोग केला गेला. वाढत्या व्यवसायासह वाढीव उत्पन्नासाठी हे दोन्ही प्रयोग उपयुक्त ठरले.

**केळीची पावडर** : पिकल्या केळीच्या गराला वाळवून व नंतर त्यावर प्रक्रिया करून केळीची पावडर बनविण्यास सुरुवात झाली. या पावडरला विविध बाजार क्षेत्रातून प्रसंगी निर्यातीसाठी मागणी असते. विशेषतः केक, चॉकलेट, मिठाई उद्योगात या पावडरचा वापर होतो. ही बाब अनुभव व प्रशिक्षणासह पुलिवेंदुला केळी उत्पादन-प्रक्रिया स्टार्टअपच्या सदस्यांना प्रशिक्षित केल्याने स्थानिक केळी उत्पादकांना बहुविध लाभ मिळाले.

**केळीपासून कापड** : केळीच्या खांबाचे तरल आवरण व कोवळ्या भागापासून उत्तम मऊसर कापड बनविले जाऊ शकते. हे कापड खरेदी करणाऱ्यांना पूर्णपणे नवे व नवलाईचे वाटते. ही बाब स्थानिक केळी उत्पादक शेतकऱ्यांना लक्षात आली व त्यांनी त्याचा अवलंब करण्यास सुरुवात केली. आज आंध्रातील नक्षीसह असणाऱ्या रेशमी कपड्यांच्या जोडीलाच केळीचे नक्षीकाम असणारे कापड विकले जाते. पहिल्या टप्प्यातच स्टार्टअपसह काम करणाऱ्या केळी उत्पादक शेतकऱ्याला एकरी सुमारे दहा हजार रु. अतिरिक्त उत्पादन मिळू लागले.

**केळीच्या पानाच्या प्लेट आणि कप** : केळीच्या पानांचा उपयोग भोजनासाठी विशेषतः दक्षिणेतील राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणात होतो. प्रसंगी सजावटीसाठीसुद्धा त्याचा वापर केला जातो. मात्र, पिकलेल्या अथवा वाळलेल्या केळीच्या पानांपासून खाद्यपदार्थ व भोजनासाठी प्लेट्स आणि चहा-कॉफी पिण्यासाठी कप बनविण्यास चालना देण्यात येऊन सदस्य शेतकऱ्यांसाठी उत्पादन-उत्पन्नाचे एक नवे दालन लाभले. एरवी दुर्लक्षित असणाऱ्या वा परंपरागत पद्धतीने वा चाकोरीबद्धपणे करण्यात येणाऱ्या केळीच्या शेतीला कल्पक व नावीन्यपूर्ण प्रयत्नांसह संशोधन व प्रगत तंत्रज्ञानाची जोड देऊन केळीच्या बागेच्या वहिवाटीतून समृद्धीची वाट दाखविण्याचे मोठे काम पुलिवेंदुला केळी उत्पादक केंद्राने केले आहे.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

## चिकनगुनिया, डेंग्यूचा प्रादुर्भाव

सध्या दमट हवामानामुळे सर्वत्र अनेक रोगांचा प्रादुर्भाव संपूर्ण महाराष्ट्रात दिसून येत आहे. या दिवसात दरवर्षी कमी-अधिक प्रमाणात रोगराई दिसून येते. परंतु यावर्षी तर कहर झाला आहे. प्रत्येक घरात एक तरी रुग्ण आढळतो आहे. चिकन गुनियाची टेस्ट निगेटिव्ह आल्यानंतर संपूर्ण लक्षणे त्याचीच असतात. यावर्षी अनेक प्रकारांनी रुग्ण ग्रासले आहेत. जसे थंडी वाजून ताप येणे, सांधेदुखी, सांधे सुजणे, वेदनादायक हालचाल, डोकेदुखी, पुरळ येणे, मळमळ, उलट्या अशी वेगवेगळी लक्षणे आहेत. या प्रकारच्या तापात नंतर बरेच दिवस अत्यंत थकवा जाणवत राहतो. यात महिला, पुरुष, लहान मुले, ज्येष्ठ नागरिक सगळेच पीडित आहेत. महापालिकेकडून सर्वत्र सर्वेक्षण, कीटकनाशक फवारणी तसेच इतर उपाय काही भागात सुरू आहेत, परंतु ते अपुरे पडताहेत आणि रुग्णांच्या संख्येत वाढ होत आहे. सांधेदुखीचा असर तर एक-दोन महिनेपर्यंत जाणवतो. यावर अहवालानुसार विशिष्ट उपचार उपलब्ध नाहीत. त्यामुळे लक्षणांनुसार उपचार केले जातात आणि वेदनादायी औषधं घेऊन रुग्णांना आराम करण्याचा सल्ला डॉक्टर देत आहेत. याचा लवकर नायनाट होवो.

**स्नेहल खंडागळे**/नागपूर

## प्रतिमा स्वच्छ करण्याचा प्रयत्न

दिल्लीच्या मुख्यमंत्री आतिशी यांनी अरविंद केजरीवाल यांचे उत्तराधिकारी म्हणून पदभार स्वीकारला. परंतु नाटके करण्यात पटाईत असलेल्या आप पार्टीने त्यांच्याकरिता मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीऐवजी दुसऱ्या खुर्चीची व्यवस्था करून त्यांची तुलना श्रीराम यांचे बंधू भरत याच्याशी करून स्वतःचे हसे करून घेतले. श्रीराम वनवासात असताना भरताने श्रीरामाच्या पादुका राजसिंहासनावर आरूढ करून राज्यकारभार सांभाळला होता. हा आदर्शवाद कुठे आणि आतिशी कुठे? वस्तुतः फक्त ४ महिन्यांकरिता हे पद असून, तोपर्यंत भ्रष्टाचार लिप्त खुर्चीवर बसून त्याची लागण होऊ नये या विचाराने आतिशी यांनी आपली प्रतिमा स्वच्छ करण्याचे नाटक सुरू केले असावे, असे वाटते.

**संजय पाठक**/९४२२१४७६७७

## वाचक पत्रे

## 'त्या' जिल्हा सहकारी बँकांवरही कारवाई व्हावी

यवतमाळ येथील बाबाजी दाते महिला सहकारी बँकेत झालेल्या घोटाळ्यात कर्मचारी व काही संचालकावर कारवाई होताना दिसत आहे. अशा प्रकारच्या कारवाया त्वरित व्हायला पाहिजे. म्हणजे अन्य दुसऱ्या कुठल्याही बँकांमध्ये किंवा सहकारी सोसायट्यांत असे प्रकार होणार नाहीत आणि जनतेचा पैसा सुरक्षित राहील. इथपर्यंत सर्व ठीक आहे. कायदा व त्याची अंमलबजावणी सगळ्यांकरिता सारखी व्हायला पाहिजे. परंतु असे होताना दिसत नाही. आता दाते महिला सहकारी बँकेचे संचालक मंडळ काँग्रेसशी संबंधित नसावे म्हणून कदाचित यांच्यावर कडक कारवाई झालेली दिसते, तसे व्हायलाच पाहिजे, परंतु तीन जिल्हा सहकारी बँका बुडाल्या त्यांच्यावर कुठलीच कारवाई झाली नाही. दोन्हीकडे कायद्याची समान अंमलबजावणी व्हावी. कारण जिल्हा सहकारी बँकेचे संचालक काँगेसशी संबंधित असल्यामुळे कारवाई झाली नाही हे म्हणण्यास वाव आहे. दाते महिला बँकेसारखी कारवाई जिल्हा सहकारी बँकेच्या संचालकांवर व्हावी तेव्हा कायदा सर्वांकरिता सारखा आहे असे म्हणता येईल. बरं यांच्यावर कारवाई न झाल्यामुळे ही घोटाळेबाज मंडळी मोकाट फिरत आहे, एवढेच नाही तर स्वतःचे वाढदिवस मोठ्या प्रमाणावर साजरे करीत आहे व या कार्यक्रमाला मंत्री देखील हजेरी लावताना दिसतात. हा तर निर्लज्जपणाचा कळसच म्हणावा लागेल. या बँकेच्या ठेवीदारांनी आपल्या रकमेसाठी प्रयत्न करावे, ही विनंती आहे.

**डॉ. जयंत ओक**/९७६४६४८३८३

## वास्तवातील प्रगती आणि धर्मरक्षण




न्यू यॉर्कमधील भारतीय वेळेनुसार २२ सप्टेंबरच्या रात्री १० वाजता अर्थात अमेरिकेतील दुपारी १२.३० वाजता भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वागत पाहिल्यानंतर भारतीयांची मान उंचावल्याशिवाय राहात नाही. पण हा सर्व सन्माननीय प्रसंग मराठी वाहिन्यांना दाखविणे लज्जास्पद का वाटावे, हा गंभीर विषय वाटतो. सर्व हिंदी वाहिन्यांनी मोठ्या दिमाखात हा वृत्तांत सादर केला यासाठी त्यांचे अभिनंदन. संपूर्ण जग ज्यांचा सन्मान करते त्यात काही तथ्य असते म्हणूनच. केवळ थापाथापी करून, बेरोजगारी आणून आणि भ्रष्टाचाराने प्रसिद्धी, मानसन्मान कधीच मिळत नाही; तर देशाची प्रगती, विकास कार्ये आणि धर्मरक्षणातूनच देशाचा विकास घडतो आणि सन्मान प्राप्त होतो. तो सन्मान करणारी जनता मुळीच मूर्ख नाही. विरोधाला विरोध याच ध्येयांनी जे कोणी पछाडले असतील त्यांनी यातून बोध घेण्याची नितांत गरज आहे असे वाटते.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# रेल्वे मार्गाच्या अडचणींसंदर्भात आ.क्षीरसागरांनी घेतली बैठक

## तक्रारी असलेल्या मार्गावर तात्काळ पाहणी करून कार्यवाही करण्याच्या सूचना

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२४ सप्टेंबर**

बीड मतदारसंघातुन जाणाऱ्या रेल्वे मार्गावर नागरिकांना अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत. रेल्वे मार्गाच्या कामात अनेक त्रुटी असल्यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. तसेच काही ठिकाणी अपघात होत आहेत. या भागातील नागरिकांनी यासंदर्भात अनेकवेळा रेल्वे विभागाशी अनेकवेळा संपर्क केला आहे. परंतु रेल्वेकडून कुठलाही सकारात्मक प्रतिसाद नागरिकांना मिळाला नाही. त्यामुळे आ.संदीप क्षीरसागर यांनी सोमवार (दि.२३) रोजी रेल्वे विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन प्रत्यक्ष, सविस्तर चर्चा करून तक्रारी असलेल्या ठिकाणांची तात्काळ पाहणी करून येथील अडचणी दूर करण्यासंदर्भात सत्वर कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

बीड मतदारसंघातून नगर-बीड-परळी रेल्वे मार्ग मोठ्या प्रमाणात गेलेला आहे. याचे कामही मोठ्या प्रमाणावर झाले आहे. परंतु या कामांमध्ये अनेक त्रुटी असल्यामुळे या भागातील नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. रेल्वे पुलांच्या खाली पावसामुळे नेहमीच खूप जास्त पाणी साचून राहते. त्यामुळे येथून वाहतूक करणे अवघड होते. ऊस वाहतूक करणारी वाहने याठिकाणाहून जाऊ शकत नाही. वाहतुकीची अडचण होत असल्याने या परिसरात रहिवाशी असलेले १५ ते २० हजार लोकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. काही ठिकाणी रोड तिरका झाल्याने अपघात होत आहेत. या होत असलेल्या अडचणींमुळे येथील नागरिकांनी आतापर्यंत रेल्वे विभागाकडे अनेकवेळा संपर्क केला. परंतु नागरिकांना याबाबत रेल्वेकडून कुठलाही सकारात्मक प्रतिसाद मिळत नव्हता. त्यामुळे आ.संदीप क्षीरसागर यांनी सोमवारी (दि.२३) शासकीय विश्रामगृह, बीड येथे रेल्वे विभागाचे संबंधित अधिकारी यांची बैठक घेतली. यावेळी रेल्वे मार्गाच्या अनुषंगाने निर्माण झालेल्या अडचणी संदर्भात अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा करून अडचणी दूर करण्यासाठी संबंधित ठिकाणच्या प्रत्यक्ष पाहणी करून प्रशासकीय स्तरावर तात्काळ कार्यवाही सुरु करण्याच्या सूचना आ.क्षीरसागर यांनी रेल्वेच्या अधिकाऱ्यांना दिल्या. या बैठकीस आ.संदीप क्षीरसागर यांच्यासह माजी आ.सय्यद सलीम, रेल्वे विभागाचे सर्व संबंधित अधिकारी व या भागातील नागरिक उपस्थित होते.

# बीड येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला लोकनेते विनायकराव मेटे यांचे नाव

## बीड आयटीआय ला लोकनेते विनायकराव मेटे यांचे नाव राज्यमंत्रिमंडळ बैठकीत निर्णय

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२४ सप्टेंबर**

मंत्रालयात आज पार पडलेल्या मंत्रिमंडळ बैठकीत राज्यातील विविध जिल्ह्यात असलेल्या १४ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था म्हणजे आयटीआय यांचे नामकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार या महाविद्यालयांना महापुरुषांचे व संबंधित जिल्ह्यात योगदान दिलेल्या व्यक्तींचे नाव देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शासनाने १४ आयटीआय यांचे नामकरण करुन १४ महान व्यक्तींची नावेदेखील या आयटीआय संस्थेसाठी देऊ केली आहेत. यामध्ये बीडमधील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांचे नाव देण्यात आले आहे.

लोकनेते विनायकराव मेटे यांनी आपल्या हयातीमध्ये विद्यार्थ्यांसाठी अनेक लढे उभे केले. बीड मधील शासकीय आयटीआय महाविद्यालयाला नेहमीच त्यांनी सहकार्याची भूमिका ठेवली होती या ठिकाणी असलेल्या वस्तीगृहाचे नूतनीकरण, पिण्याचे पाण्याची व्यवस्था याबरोबरच अनेक समस्या सोडवण्याचे काम त्यांनी केले होते. त्यांच्या अकाली निधनानंतर त्यांच्या कार्याला स्मरून आज राज्य सरकारने बीड येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला लोकनेते विनायकराव मेटे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था असे नामकरण करण्यावर शिक्कामोर्तब केला, यानंतर शिवसंग्रामच्या कार्यकर्ते, पदाधिकारी व लोकनेते विनायकराव मेटे यांच्यावर प्रेम करणा-या चाहत्यांनी एकत्र येत शिवसंग्राम भवन येथे आनंद व्यक्त केला आणि लोकनेते विनायकराव मेटे यांच्या स्मृतिस्थळी जाऊन आदरांजली अर्पण करत अभिवादन केले. याप्रसंगी शिवसंग्रामचे प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे, जिल्हाध्यक्ष नारायणराव काशीद, जिल्हा सरचिटणीस अनिल घुमरे,शहराध्यक्ष सुहास पाटील मनोज जाधव, सचिन कोटुळे शेषराव तांबे,डॉ. राजेंद्र बंड,योगेश शेळके,सुनील कुटे, ज्ञानेश्वर कोकाटे, हनुमंत पवार,मच्छिंद्र कुटे, शेख आबेद, अक्षय माने, राजेंद्र आमटे,अमजद पठाण, शेख लालाभाई,,शैलेश सुरवसे, हरिश्चंद्र ठोसर, प्रशांत डोरले, राहुल शाहगडकर ,मुकुंद गोरे,राजेश माने,गणेश धोंडरे,कैलास शेजाळ,गणेश साबळे, विजय सुपेकर,अशोक लोकरे,सुहास मेटे,कुंदन गायकवाड,हरीश शिंदे,

# महाराष्ट्रात प्रथमच बाल दिव्यांग महोत्सव

## ५ ऑक्टोंबरला बीड येथे शुभारंभ

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२४ सप्टेंबर**

येथील अखिल भारतीय मराठी नाटय परिषदेची घटक संस्था बालरंगभूमी परिषद प्रत्येक जिल्हास्तरावरती दिव्यांग महोत्सव घेणार आहे. ५ ऑक्टोंबरला बीड दिव्यांग महोत्सवापासून याची सुरूवात होणार असल्याची माहिती बीड शाखेच्या अध्यक्ष तथा बालरंगभूमी परिषदेच्या उपाध्यक्ष प्राचार्य डॉ.दीपाताई क्षीरसागर यांनी दिली आहे. बालरंगभूमी परिषद आपल्या व्याप्तीनुसार मुलांच्या सांस्कृतिक,शैक्षणिक व सामाजिक उन्नतीसाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. मुलांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने कार्य करत असताना विशेष मुलांना सुध्दा व्यासपीठ उपलब्ध व्हावे.त्यांच्यातील सुप्त कलागुणांना वाव, प्रोत्साहन देवून त्यांना सक्षम मुलांच्या प्रवाहात आणण्यासाठी यहाँ के हम सिंकदर हा विशेष मुलांच्या कलागुण सादरीकरणाचा एक प्रयत्न आहे.

दिनांक ५ ऑक्टोंबर २०२४ रोजी



सौ.के.एस.के.महाविद्यालयाच्या परिसरात सकाळ पासून सुरू होणार्या महोत्सवात बीड जिल्हयातील जवळपास २५ दिव्यांग शाळेंचा सहभाग असणार आहे. यात कर्णबधीर, मुकबधीर, अंध,मतीमंद, अस्थिव्यंग अशा अनुदानित, विनाअनुदानीत शाळांचा सहभाग घेता येणार आहे.विशेष मुलांच्या गुण कौशल्याचे कौतुक करणारा हा महोत्सव असून ही स्पर्धा नाही. यात नाटक,नक्कला,गाणे,नृत्य , रांगोळी,चित्र योगा,वाद्यवाजवणे, शिल्पकला यातील कोणतीही कला हे विशेष मुले करू शकतात.महोत्सवाच्या ठिकाणी या

**यहाँ के हम सिकदंर बालरंगभूमी परिषदेचा उपक्रम!**

मुलांनी बनवलेल्या वस्तुचे प्रदर्शन व विक्रीसाठी ठेवता येणार आहे.

महाराष्ट्रात बीड जिल्हयापासून या महोत्सवाला सुरूवात होत असून जास्तीत जास्त संख्येने दिव्यांग शाळांनी, विद्यालयांनी, संस्थानी,शिक्षकांनी, विशेष मुलांनी यात सहभाग घ्यावा असे अवाहन बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्ष श्रीमती. निलम शिर्के सामंत,उपाध्यक्ष डॉ.दीपा क्षीरसागर,शैलेश गोजमगुंडे,प्रमुख कार्यवाह सतिश लोटके,राजु तुलालवार, दिपक रेंगे, श्रीमती दिपाली शेळके,आसेफ अन्सारी सर्व कार्यकारिणी मंडळ तसेच यहा के हम सिकंदर दिव्यांग महोत्सव समितीचे धनंजय जोशी, नंदकिशोर जुवेकर, दिपाली




शेळके, नागसेन पेंढारकर बीड शाखेचे डॉ.संजय पाटील देवळाणकर,स्नेहल पाठक,शाहीर विलास सोनवणे,अनुराधा चिंचोलकर,दुष्यंता रामटेके आदिंनी केले आहे.संपर्कासाठी विजय राख ९८३३३४५८०९ ,दिपक जमधाडे ८८८८८५०३५८,नामदेव साळूंके ८३०८३६३३३५,सुरेश थोरात ९४२२९११०९०,मिलींद शिवणीकर ९४२२९३०४९०,अमित गाडे ८८८८९५९७९२,प्रदिप भोकरे ९८२२५९९६९७,अक्षय फुलझळके ९६३७९९९६२९,सुरेश साळूंके ९८२३६०१४८० यांच्याशी संपर्क साधावा.

# हरवला आहे

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.२४ सप्टेंबर**

तालुक्यातील सारणी (आ) येथील रहिवाशी असलेला विश्वजित ज्ञानेश्वर हांडे हा मुलगा इयत्ता ८ वी वर्गात शिक्षण घेत होता तो रविवारी तेलगाव हून परळी कडे जाताना हरवला आहे.

याबाबत सविस्तर वृत्तांत असा की, सारणी (आ) येथील इयत्ता ८ वी वर्गात शिकणारा विश्वजित ज्ञानेश्वर हांडे हा विद्यार्थी परळी जवळ असलेल्या तपोवन येथे शिक्षण घेत आहे. रविवारी त्याच्या आजीने तेलगाव येथून परळी कडे जाणाऱ्या बस मद्ये त्याला बसवून दिले व शेजारी असणाऱ्या महिलेला सांगितले की तपोवन येथे त्याला



उतरवा तो विद्यार्थी दोन दिवसांनी जातो अस म्हणत होता मात्र त्याची शाळा बुडेल म्हणून आजीने त्याला रविवारी पाठवून दिले मात्र तपोवन या ठिकाणी तो विद्यार्थी पोहचलाच नाही त्यामुळे त्याच्या पालकांनी गावाकडे नातेवाईक यांच्या कडे चौकशी केली मात्र तो कुठेही सापडला नाही त्यामुळे त्याचा शोध सुरू असून हा विद्यार्थी कुठेही कोणाला आढल्यास ९६९९३९४०४० किंवा ९९२२६६२७७७ या क्रमांकावर कृपया संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

# बीड जिल्ह्यात सोयाबीन खरेदी केंद्र तात्काळ सुरू करावेत-आ.पंकजा मुंडे

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२४ सप्टेंबर**

शासनाने जिल्हयात आधारभूत किंमत दराने सोयाबीन खरेदी केंद्र तात्काळ सुरू करून सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा द्यावा आणि खरेदीचे अधिकार मार्केट कमिटीला द्यावेत अशी मागणी भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे यांनी केली राज्य सरकारकडे पत्राद्वारे केली आहे.



जिल्हयात सोयाबीनचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होते, शेतकरी याकडे नगदी पीक म्हणून पाहतात. सध्या जिल्हयात पावसाचे प्रमाण वाढले आहे त्यामुळे सोयाबीन पीक खराब होण्याची भीती शेतकऱ्यांना आहे. त्यामुळे शेतमाल हंगाम २०२४-२५ साठी जिल्हयात सर्वच ठिकाणी आधारभूत किंमत दराने सोयाबीन खरेदी केंद्र सुरू करणे आवश्यक झाले आहे, खरेदी केंद्र सुरू करतानाच त्याचे खरेदीचे अधिकार मार्केट कमिटिला देण्यासाठी सरकारने तात्काळ पावले उचलून तमाम शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशी मागणी आ. पंकजाताई मुंडे यांनी केली आहे.

# शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था बीड येथे प्रशिक्षण मेळावा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२४ सप्टेंबर**

शासनाने राज्यातील १२ पदविका, पदवी, आयटीआय उत्तीर्ण तरुणांना कार्य प्रशिक्षण अनुभव मिळण्यासाठी मुख्यमंत्री युवा कार्य व शिक्षण योजना जाहीर केली असून कार्य प्रशिक्षण हे ६ महिने कालावधीसाठी असणार आहे.

कार्य प्रशिक्षण कालावधीत उमेदवारांना १२ पास ६ हजार रुपये आयटीआय किंवा पदविका फॉर्म ८ हजार रुपये तर पदवी किंवा पदवीव्युत्तर उमेदवारांना १० हजार रुपये मानधन असणार आहे. कार्य प्रशिक्षणानंतर उमेदवारास प्रमाणपत्रही दिले जाणार आहेत. सदर योजनेअंतर्गत मोठ्या संख्येने युवक सहभागी होत असून बीड परिसरातील उमेदवारांना योजनेचा लाभ होण्यासाठी संस्थेने मुख्यमंत्री युवा कार्य व प्रशिक्षण योजना मेळावा २४ सप्टेंबर २०२४ व २६ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता औद्योगिक प्रशिक्षण संस्था बीड येथे आयोजित करण्यात आला आहे.यासाठी परिसरातील विविध आस्थापना उपस्थित राहणार आहेत. शैक्षणिक पात्रता धारक उमेदवारांनी मेळाव्यास उपस्थित राहून या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य यांनी केले आहे.

# पत्रकार रवी उबाळे यांना पितृशोक

## सुरेश उबाळे यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२४ सप्टेंबर**



एसटी महामंडळ बीड आगार येथील सेवानिवृत्त वाहतूक नियंत्रक सुरेश उबाळे यांचे अल्पशा आजाराने सोमवारी दि.२३ सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी १.५५ वाजता उपचारा दरम्यान निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, चार मुले, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# सौ.के.एस.के.महाविद्यालयात ग्रामीण पत्रकारिता अभ्यासक्रमास प्रवेश सुरू

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२४ सप्टेंबर**

येथील नवगण शिक्षण संस्थेच्या सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात व डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,छत्रपती संभाजीनगर आजीवन शिक्षण व विस्तार विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणार्या अभ्यासक्रमांना प्रवेश देणे सुरू आहे.या अभ्यासक्रमातील प्रमाणपत्र कोर्स किमान बारावी पास झालेल्या विद्यार्थ्यांना कौशल्यानुसार स्वयंरोजगार सुरू करण्यासाठी व नौकरीच्या विविध संधी मिळावी म्हणून उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी ग्रामीण पत्रकारिता (सहा महिने) या अभ्यासक्रमाला प्रवेश देणे सुरू असून विद्यार्थ्यांनी लवकरात लवकर सदरील विषयाच्या प्रवेशासाठी डॉ.अशोक डोंगरे (समन्वयक) मो.क्र. ९४२३७१६९४१, डॉ.रामनाथ वाढे मो.क्र.९७६७०८७४१४ यांच्याशी संपर्क साधावा व प्रवेश घ्यावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर, पदव्युत्तर संचालक डॉ.खान ए.एस., उपप्राचार्य डॉ.नारायण काकडे, पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर यांनी केले आहे. तर वरील अभ्यासक्रमांला प्रवेश घेण्यासाठी यांच्याशी संपर्क साधावा.

# तुळजाभवानी संस्थेला तब्बल १८ कोटी ५२ लाख रूपयांचा नफा; चेअरमन चंद्रकांत शेजुळ यांनी दिली माहिती

**सभासदांना १० टक्के लाभांशही देणार**

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२४ सप्टेंबर**

सहकार क्षेत्रात मानबिंदू ठरलेल्या तुळजाभवानी अर्बन मल्टीस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लि.माजलगाव संस्थेने यंदाही आपली गरूड झेप कायम ठेवली असून संस्थेला तब्बल १८ कोटी ५२ लाख रुपयांचा नफा झाला आहे, अशी माहिती संस्थेचे चेअरमन चंद्रकांत शेजुळ यांनी रविवारी दिली. संस्थेच्या १३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या अध्यक्षस्थानावरून बोलत होते. दरम्यान, संस्थेच्या सभासदांना १० टक्के डिव्हीडंड अर्थात लाभांश देण्यात येणार असल्याची घोषणा चंद्रकांत शेजुळ यांनी केली.



माजलगाव येथील व्यंकटेश मंगल कार्यालयात रविवार, दि.२२ सप्टेंबर रोजी संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्यात आली. अध्यक्षस्थानी चेअरमन चंद्रकांत शेजुळ होते. सभेच्या प्रारंभी महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी माता व कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तर दीपप्रज्वलन बँकिंग तज्ज्ञ नितीन वाणी यांच्या हस्ते आणि सर्व सन्माननीय संचालकांच्या उपस्थितीत करण्यात आले. या मंगल प्रसंगाची सुरूवात महाराष्ट्रगीत आणि मराठवाडा गीताने करण्यात आली. याप्रसंगी सर्व सभासदांचा यथोचित सन्मान करण्यात आला. सभेचे प्रास्ताविक उपाध्यक्ष ज्ञानेश्वर देशमुख यांनी केले तर तुळजाभवानी अर्बनचे मुख्य कार्यकारी अधिकारी शहाजी शेजुळ यांनी सभेसमोरील महत्त्वपूर्ण विषयांचे बाचन करून उपस्थित मान्यवरांचे लक्ष वेधले.

या सभेला संचालक भारत रामराव होके, अभय रामराव पवार, सुशिल रामराव डक, नितीन मदनराव काळे, राजेश्वर राधाकिसन कुलथे, दिनेश पंडितराव बिराजदार, तुकाराम महादेव जगधने, वैशाली विजयसिंह सोळंके, शोभा मदनराव आंबोरे, भास्कर गवळी आदींची उपस्थिती होती. सभेचे सूत्रसंचालन पुरुषोत्तम जाधव, नारायण झोडगे यांनी तर आभार संस्थेचे विभागीय अधिकारी नवनाथ शिंगणे यांनी मानले. वार्षिक सर्वसाधारण सभा यशस्वी करण्यासाठी तुळजाभवानी अर्बनचे सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. शेवटी पसायदानाने सभेची सांगता झाली.

**वार्षिक ताळेबंदाचा आढावा; संस्थेला 'अ' वर्ग दर्जा कायम**

संस्थेचे चेअरमन चंद्रकांत शेजुळ यांनी वार्षिक ताळेबंदाचा आढावा घेतला. पुढे बोलताना चंद्रकांत शेजुळ म्हणाले, २०१२ साली संस्थेची स्थापना करण्यात आली. आजमितीला संस्थेकडे सभासद आणि ग्राहकांची १,४४,०३० एवढी संख्या आहे. संस्थेचे भागभांडवल ९ कोटी ९६ लाख एवढे आहे. संस्थेकडे ५९१ कोटी ६९ लाख रूपये ठेवी आहेत. संस्थेने तब्बल ३८३ कोटी रूपयांचे कर्ज ग्राहकांना दिले आहे. संस्थेचा निव्वळ नफा १८ कोटी ५२ लाख एवढा झाला आहे. संस्थेला 'अ' ऑडिट वर्ग मिळाला असल्याची माहिती शेजुळ यांनी दिली.

# सुंदरराव सोळंके महाविद्यालयात राज्यस्तरीय वाद विवाद स्पर्धा

## नवीन धोरण ठरवताना चर्चा घडवून आणणे स्तुत्य उपक्रम-आ.सोळंके

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२४ सप्टेंबर**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री सुंदरराव सोळंके यांच्या जयंतीनिमित्त सुंदरराव सोळंके महाविद्यालयात दि २३ सप्टेंबर रोजी राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत संभाजीनगर सह अनेक महाविद्यालयाने सहभाग घेतला.




सुंदरराव सोळंके महाविद्यालयात सुंदरराव सोळंके यांच्या जयंतीनिमित्त नवीन शैक्षणिक धोरणाने उच्च शिक्षणाचा दर्जा सुधारेल का/ नाही या विषयावर राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेच्या उद्घाटनपर कार्यक्रमाचे अध्यक्ष म.शि.प्र.मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रकाश सोळंके होते.तर स्पर्धेचे उद्घाटन महाविद्यालय विकास समिती सदस्य ऍड.भानुदासराव डक यांनी केले. यावेळी प्राचार्य डॉ.जी.के. सानप,उपप्राचार्य डॉ.एम. ए.कव्हळे, उपप्राचार्य डॉ. एन.के. मुळे,प्रा.बालाजी बोडके,प्रशांत चव्हाण, सतीश एरंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना आ. प्रकाश सोळंके म्हणाले की, एखादे नविन धोरण ठरवत असताना त्याविषयी समाजात चर्चा घडवून आणणे हे महत्त्वाचे आहे.त्या दृष्टिकोनातून सुंदरराव सोळंके महाविद्यालयात नवीन राष्ट्रीय धोरणाविषयी स्पर्धेच्या माध्यमातून चर्चा घडवून आणली जात आहे हे स्तुत्य आहे .

राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर सह अन्य जिल्ह्यातून स्पर्धक सहभागी झाले. यामध्ये माणिकचंद पहाडी विधी महाविद्यालय संभाजीनगर (प्रथम), श्री सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगाव( द्वितीय), तर राजमाता जिजाऊ महाविद्यालय धारूर (तृतीय ) या महाविद्यालयाने पारितोषिक पटकावले.स्पर्धेचे परीक्षण प्रा. डॉ.रामहरी मायकर, डॉ.रिंगणे, प्रा. भरत खेत्री यांनी केले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. जी.के. सानप यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.ज्ञानेश्वर कुंडकर यांनी केले तर आभार प्रा. बालाजी बोडके यांनी मानले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्रा डॉ ज्ञानेश्वर शिंदे,प्रा.डॉ. गणेश मोकासरे,प्रा.डॉ.अरुण पेंटावार,प्रा. सुदर्शन स्वामी, प्रा. प्रकाश शिंदे, प्रा.सिद्धेश्वर कदम यांनी परिश्रम घेतले.

# शेतकऱ्यांना कृषी पंपाचे आ.साकोरे यांच्याहस्ते वाटप

**जिंतूर,/प्रतिनिधी:** जिंतुर -सेलु येथे २००० शेतकऱ्यांना कृषी पंपाचे आमदार मेघना बोर्डीकर यांच्या हस्ते वाटप करण्यात आले होते.
महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत तालुक्यास्तरीय पौष्टिक तृणधान्य विकास कार्यक्रमा अंतर्गत शेतकरी प्रशिक्षण का. पु.एकात्मीककापुस व सोयाबीन उत्पादकता वाढ योजनेअंतर्गत जिंतुर तालुक्यातील १००० व सेलु तालुक्यातील १००० लाभार्थ्यांना मोफत कृषी पंपाचे वाटप आमदार मेघना बोर्डीकर यांच्या हस्ते करण्यात आले.
महायुतीच्या काळात शेतकऱ्यासांठी अनेक लाभादायक योजना राबविण्यात येत आहेत . मोफत बील,मोफत सोलार,एक रूपयांत पिक विमा ,मोफत कृषी पंप,कामगारांना मोफत भांडी वाटप यासारख्या कल्याणकारी योजना महायुती सरकार राबवित आहेत व याचा जास्तीत जास्त लाभ जिंतुर-सेलु मतदार संघांतील नागरिक शेतकरी घेत आहेत.यासाठी मी सातत्याने प्रशासनाच्या संपर्कात राहुन या योजना राबविण्यासाठी प्रयत करत आहेत.असे आमदार मेघना बोर्डीकर यांनी यावेळी बोलताना सांगितले.याप्रसंगी तहसीलदार मगर,तहसीलदार सरवदे,सेलु कृषी अधिकारी कदम,जिंतुर कृषी अधिकारी श्री.पाईकराव,तालुकाध्यक्ष ॲड दत्ता कदम,अजय डासाळकर,शिवाजी काळे ,माधव



दराडे,इंद्रजीत घाटुळ,अनिल पवार,जोगदंड महाराज,बाळासाहेब आघाव,अनिल पवार,संगिता जाधव व शेतकरी बांधव आदी जण उपस्थीत होते .,



**जिंतूर- आज दि.१८ सप्टेंबर रोजी जिंतूर येथे सागर निवासस्थानी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस सचिव सुरेश भैया नागरे यांच्या उपस्थितीमध्ये खवणे पिंपरी तालुका सेलू येथील राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे सोमेश्वर गायके, विठ्ठल गायके, उद्धव चव्हाण, दादाराव घोडे, दिगंबर गायके, खंडू चांदणे, इत्यादी कार्यकर्त्यांनी राष्ट्रीय काँग्रेस पक्षांमध्ये जाहीर प्रवेश केला यावेळी माजी जिल्हा परिषद अध्यक्ष प्रसादराव बुधवंत, माजी जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र नागरे, माजी जिल्हा परिषद सदस्य अविनाश भाऊ काळे,माजी पंचायत समिती सदस्य माऊली थोरात, माजी पंचायत समिती सदस्य विश्वनाथ गंनगे, माजी सरपंच रमेशराव काठोळे, सरपंच राजेश चव्हाण, भगवानराव गायकवाड, आदी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते दिसत आहेत.**

## संक्षिप्त वृत्त...

### सोनपेठ तालुका पोलिस पाटील संघटनेच्या अध्यक्षपदी मुंजाभाऊ घुमरे व पूजा बोकरे यांची बिनविरोध निवड

**सोनपेठ,/प्रतिनिधी:** सोनपेठ तालुका पो पाटील संघटनेच्या अध्यक्षपदी :- मुंजाभाऊ घुमरे व पुजा ताई बोकरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.
सोनपेठ तालुक्यातील ५४ गावच्या प्रशासन नियुक्त पोलीस पाटील यांच्या दि ९ सप्टेंबर रोजी छत्रपती शिवाजी महाराज सांस्कृतिक सभागृह सोनपेठ येथे संपन्न झालेल्या बैठकीतुन सर्वानुमते नवनि पोलीस पाटील संघटना कार्यकारिणी निवडण्यात आली यामध्ये तालुका पोलीस पाटील संघटना अध्यक्षपदी मुंजाभाऊ भुमरे व सौ पूजाताई बोखरे. उपाध्यक्षपदी रितेश पवार व राधिका राठोड कोषाध्यक्षपदी नागनाथ रोडे यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली या बैठकीत नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा एकत्रित सत्कार करण्यात आला या निवड प्रक्रियेमध्ये ज्येष्ठ पोलीस पाटील अश्रुबा कुरवाडे, शेषराव चव्हाण, सुनील गोरे, तानाजी आचार्य, अच्युत सावंत, मदन सोनवणे, ताटे इत्याादी पोलीस पाटलांचे मार्गदर्शन लाभले.

### जागा सुटली म्हणून भाजपाव्दारे आनंदोत्सव साजरा- महायुतीतील जागा वाटप

**परभणी,/प्रतिनिधी:** आगामी विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमिवर भारतीय जनता पार्टी, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व अन्य घटक पक्षांच्या महायुतीतून परभणी विधानसभा मतदारसंघाची जागा भारतीय जनता पार्टीस सुटल्याचा दावा करीत पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांनी शुक्रवारी परभणीतील छत्रपती शिवाजी चौकात फटाक्यांची आतिषबाजी करीत आनंदोत्सव साजरा केला.
भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते विजयराव वरपुडकर, उद्योग आघाडीचे प्रदेशाध्यक्ष प्रमोद वाकोडकर, भाजप महानगराध्यक्ष राजेश देशमुख, पार्टीचे जिल्हा सरचिटणीस तथा बाजार समिती सदस्य विलास बाबर, डॉ. केदार खटींग, बाळासाहेब जाधव, सुनील देशमुख, माजी नगराध्यक्ष कमल किशोर अग्रवाल, माजी नगरसेवक मधुकर गव्हाणे, प्रदेश कार्यकारणी सदस्य मोहन कुलकर्णी, राजेश देशपांडे, माजी नगरसेविका सौ. मंगल मुदगलकर, विजय गायकवाड, राधाजी शेळके, शिवाजीराव मवाळे, सुरेश गिरी, संजय रिझवानी, सुरेश भुमरे, अनुप शिरडकर, दिनेश नरवाडकर, ॲड. एन.डी. देशमुख, नागसेन पुंडगे, सुभाषराव आंबट यांच्यासह अन्य पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शुक्रवारी सकाळी छत्रपती शिवाजी चौकात फटाक्यांची जोरदार आतिषबाजी केली. या आतिषबाजीने संपूर्ण परिसर दणाणला.

### लायन्स क्लबकडून महारक्तदान शिबीर

**परभणी,/प्रतिनिधी:** परभणी लायन्स क्लब परिवाराचे भिष्मपितामह माजी प्रांतपाल स्व. डॉ. के.सी. पारख यांच्या जन्म दिनानिमित्त लायन्स क्लब परिवारातर्फे २२ सप्टेंबर रोजी महाविक्रमी रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले आहे.
स्टेडिअम जवळील नूतन जिल्हा परिषदेच्या इमारतीत सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत हे महाविक्रमी रक्तदान शिबीर होणार असून रक्तदान केलेल्या प्रत्योकाला १ लाख रुपयांचा मोफत अपघाती विमा काढून मिळणार आहे. या महारक्तदान शिबीरात रक्तदान करुन नागरीकांनी राष्ट्रसेवेत सहभाग नोंदवावा, असे आवाहन उपक्रम प्रमुख लायन्स क्लब परभणी प्रिन्सचे रितेश झांबड जैन, सहउपक्रमप्रमुख लायन्स क्लब परभणी मेनचे हैदरअली जीवानी, विजय श्रीमाळी, रिजन चेअर पर्सन तथा मार्गदर्शक प्रिया ठाकूर, झोन चेअर पर्सन शिवकुमार पुरे, झोन चेअर पर्सन तुषार मराठे, माजी रिजन पर्सन डॉ. प्रविण धाडवे, लायन्स क्लबचे अध्यक्ष पंडीत बरदाळे, लायन्स क्लब परभणी प्रिन्सचे अध्यक्ष उल्हास नाव्हेकर, लायन्स क्लब परभणी रायझिंग वुमन्सच्या अध्यक्षा पुनम मराठे, लायन्स क्लब परभणी मेनचे अध्यक्ष अरुण टाक यांनी केले आहे.

### परळीकर यांनी साकारला सामाजिक संदेश देणारा देखावा

**परभणी,/प्रतिनिधी:** मंगळमुर्ती त्रिमूर्ती नगरातील रहिवाशी महेश सुधाकरराव परळीकर यांनी गणेशोत्सवानिमित्त 'झाडे लावा झाडांचे संगोपन करा' असा सामाजिक संदेश देणारा देखावा आपल्या निवासस्थानी उभा केला आहे.
'झाडे लावा झाडांचे संगोपन करा' या संकल्पनेवर स्वहस्ते श्रीगणेश झाडं लावत असलेली, मूषकराज पाणी घालतोय अशी शाडूच्या मातीपासून पार्थिव मुर्ती तयार केली आहे. आपल्या महाराष्ट्रात पर्जन्यवृष्टी कमी आहे ती वाढविण्यासाठी जास्तीत जास्त झाडे लावून झाडाला एक वर्ष पाणी देवून संवर्धन करणे आवश्यक, प्राणीमात्रांना जीवदान देणाऱ्या या उपक्रमाला प्राधान्य देऊन मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्यावर भर द्यावा लागेल. अन्यथा पुढच्या पिढीला वन्य प्राणी हे चित्रातच पाहावे लागतील. वन्यजीव राहात असलेल्या जागांवर टोलेजंग टॉवर्स उभे राहून त्यांच्या हक्काच्या जागा अतिक्रमीत होत आहेत त्याामुळे वनसंवर्धन हीच काळाची गरज आहे, अशी प्रतिक्रिया परळीकर यांनी व्यक्त केली.

### गांधीच्या वकत्व्या विरोधात भाजपाव्दारे निदर्शने

**परभणी,/प्रतिनिधी:** काँग्रेसचे नेते तथा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आपल्या अमेरिकेच्या दौऱ्यात एका विद्यापीठात आरक्षणा संदर्भात केलेल्या आक्षेपार्ह विधानाच्या निषेधार्थ भारतीय जनता पार्टीच्या ग्रामीण व महानगर शाखेच्या वतीने शुक्रवारी येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार निदर्शने करण्यात आली.
भारतीय जनता पार्टीचे जिल्हा सरचिटणीस तथा कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती विलास बाबर, उद्योग आघाडीचे प्रदेशाध्यक्ष प्रमोद वाकोडकर, महानगराध्यक्ष राजेश देशमुख, डॉ. केदार खटिंग, सुरेश भुमरे, बालाजी रुद्रवार, राधाजी शेळके, दत्ता साबळे, शिवाजी मोहाळे, सौ. मंगला मुदगलकर, सुभाष आंबट, ऋषिकेश शेकनुर, बोरुळकर, प्रकाश गोरे, दिनेश नरवाडकर, संजय रिझवानी, मधुकर गव्हाणे, पांडुरंग राठोड, संतोष सिंग टाक, अनंता गोलाईत, मोहन कुलकर्णी, भालचंद्र गोरे, पांडुरंग वाळवटे, पांडुरंग नखाते, श्रीराम राठोड यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते या निदर्शन आंदोलनात सहभागी होते. लोकसभा निवडणुकीत संविधान बदलण्याचा खोटा प्रचार करून दिशाभूल करणाऱ्या राहुल गांधींनी अमेरिकेत जाऊन दलित, आदिवासी बांधवांबद्दल त्यांच्या आरक्षणाबाबत केलेले वक्तव्य निषेधार्य असून खरा चेहरा काँग्रेस व एनडी आघाडीचा समोर आला आहे. गेल्या दहा वर्षापासून मोदी सरकारने दलित आदिवासी घटकाचा केलेला विकास काँग्रेस जणांना पाहवत नाही.

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

## सॅनरो एज्युकेअर प्रायव्हेट लिमिटेड संचलित क्युरियस किड्स प्री स्कूल व फिनिश एज्युकेशन फिनलंड यांच्यात सामंजस्य करार

**सेलू,/प्रतिनिधी-** सॅनरो एज्युक्युअर प्रायव्हेट लिमिटेड संचलित क्युरियस किड्स प्री स्कूल आणि फिनिश एज्युकेशन यांच्यात सामंजस्य करार करण्यात आली आहे. हा करार दिल्ली येथे एका कॉन्फरेन्स दरम्यान झाला. या करारानुसार क्युरियस किड्स प्री स्कूलला जगातील सर्वोत्तम फिनिश एज्युकेशन चे मान्यता प्रमाणपत्र प्राप्त होणार असून, त्याद्वारे ऑनलाइन प्रशिक्षण व होमवर्क टास्क प्रदान केले जातील. ऑनलाइन प्रशिक्षण व्हिडिओद्वारे सादरिकरण केले जाईल, ज्यामुळे विद्यार्थ्यांना आकर्षक आणि प्रभावी पद्धतीने शिक्षण दिले जाईल.
यासोबतच, पालक आणि शिक्षकांना फिनलँडच्या शिक्षण पद्धतीवर विशेष प्रशिक्षण दिले जाणार आहे, ज्यामुळे शिक्षकांच्या अध्यापन कौशल्यांमध्ये सुधारणा होईल. या करारामुळे क्युरियस किड्स प्री स्कूलला फिनलँडचे करिक्युलम देखील उपलब्ध होणार आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण मिळेल.




या महत्वपूर्ण कराराबाबत सॅनरो एज्युक्युअर प्रायव्हेट लिमिटेड संचलित क्युरियस किड्स प्री स्कूलचे चेअरमन डॉ. संजय रोडगे यांनी माहिती दिली. त्यांनी दिल्लीतील एका विशेष कॉन्फरन्स दरम्यान या करारावर स्वाक्षरी केली.

## ब्राह्मण समाजासाठी परशुराम आर्थिक विकास महामंडळाची शासनाकडून घोषणा पूर्णा ब्राह्मण समाजाकडून जल्लोष व स्वागत

**पूर्णा,/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाच्या कॅबिनेट मंत्रिमंडळात ब्राह्मण समाजासाठी परशुराम आर्थिक विकास महामंडळाला स्थापना व मंजुरी दिल्यामुळे पूर्णा येथील सकल ब्राह्मण समाजाकडून शासनाच्या या निर्णयाचे स्वागत करून फटाके फोडून आनंद उत्सव साजरा करण्यात आला.



गेल्या अनेक वर्षांपासून ब्राह्मण समाजाकडून परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापना करण्यात यावी अशी मागणी करण्यात येत होती. यासाठी आंदोलने व पाठपुरावाही करण्यात आला होता. जालना येथे दीपक रणनवरे व सर्व ब्राह्मण समाज बांधवांनी यासाठी उपोषणही करून महाराष्ट्र शासनाचे लक्ष वेधून घेतले होते, शासनाने सोमवारी २३ सप्टेंबर रोजी आर्थिक विकास मंडळाची स्थापना करण्याचा निर्णय घेतला या निर्णयाच्या ब्राह्मण समाजाकडून आनंद व स्वागत करण्यात आले शहरातील दत्त मंदिर परिसरात फटाके फटाके फोडून जल्लोष करण्यात आला,यावेळी आयोजित कार्यक्रमात भगवान परशुराम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले यावेळी भगवानराव पाटील, भास्करराव भाले, सतीश टाकळकर यांनी विचार व्यक्त केले सूत्रसंचालन व आभार लक्ष्मण वांगे यांनी केले या याप्रसंगी प्रा. चंद्रकांत बुरटे ,अरविंदगुरु जोशी , भगवानराव पाटील, भास्करराव भाले, डॉ. दीपक जोशी, सुरेंद्र चिटणीस, विजय कनकदंडे ,रवींद्र चिटणीस, गोविंद चौधरी, मधुकर जोशी, मकरंद कुलकर्णी, सतीश टाकळकर, सुनील देशमुख ,सुभाषचंद्र ओझा, श्यामगुरु जोशी, रवी पांडे, तुषार पाटील, गिरीश जोशी, यांच्यासह ब्रह्मवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

### त्या दुकानदारास सुरेश नागरे यांच्याकडून आर्थिक मदत

**जिंतूर,/प्रतिनिधी:** जिंतुर - सेलू मधील दिलदार व्यक्तिमत्व म्हणजे श्री.सुरेशभैय्या नागरे. शॉर्टसर्किटमुळे नुकसान झालेल्या दुकानदाराला झटपट आर्थिक मदत. जिंतुर तालुक्यातील मौजे अंगलगाव येथील संदीप कांडुरे यांच्या छोट्या किराणा दुकानास विजेच्या शॉर्टसर्किटमुळे आग लागून प्रचंड आर्थिक नुकसान झाले. आपल्या रोजगारच साधनच संपला हा विचार करुन दुकानदार हतबल झाला होता. ही दुःखद बातमी सुरेशभैय्या नागरे यांना समजताच ते कामात व्यस्त असुन देखिल त्यांनी तात्काळ मदतीचा हाथ पुढे केला. त्यांनी त्यांचे सहकारी माजी जिल्हापरिषद अध्यक्ष श्री.प्रसादराव बुधवंत, माजी जिल्हापरिषद श्री.सदस्य राजेंद्र नागरे, श्री.अनंतराव घुगे यांना पाठवून कांडुरे कुटुंबियांना छोटीशी मदत म्हणुन १५००० हजार रुपयांची आर्थिक मदत केली.



### जिंतूर ते परभणी रोडवर स्कुटी-एसटीचा अपघातात एक ठार

**जिंतूर,/प्रतिनिधी:** जिंतूर ते परभणी रोडवर स्कुटी एसटी अपघातात एक ठार जिंतूर ते परभणी रोडवर खूप पाठी जवळ आज सकाळी जिंतूर ते अमळनेर या एसटी व स्कुटी समोरासमोर अपघात होऊन बोरी येथील सुप्रसिद्ध डॉक्टर लक्ष्मीकांत जाधव हे आपल्या स्कुटी वरून शेताकडून गावात बोरीकडे येत असताना जिंतूर ते अमळनेर सीएसटी परभणी कडे जात असताना खूप मोठी जवळ समोरासमोर अपघात होऊन या अपघातामध्ये स्कुटी वरील डॉक्टर लक्ष्मीकांत जाधव यांनी जोरदार धडक दिल्यामुळे डॉक्टर लक्ष्मीकांत जाधव हे जागीच पडले व त्यांच्या डोक्याला मार लागल्यामुळे त्यांना आजूबाजूच्या नागरिकांनी तात्काळ परभणी येथे सामान्य रुग्णालयात नेत असताना त्यांचा वाटेतच मृत्यू झाला ही घटना बुधवारी सकाळी आठच्या दरम्यान घडली या घटनेमुळे बोरी गावावर सुखाचा डोंगर कोसळला आहे



## पंजाब येथे होणाऱ्या धनुर्विद्या स्पर्धेसाठी वाघेची निवड

**सोनपेठ,/प्रतिनिधी-** येथील कै.रमेश वरपूडकर महाविद्यालयाचा विद्यार्थी प्रथमेश शिवमल्हार वाघे याने परभणी येथे झालेल्या विद्यापीठ स्तरीय अंतर महाविद्यालयीन धनुर्विद्या (आर्चरी) या स्पर्धेत विद्यापीठातून प्रथम क्रमांक पटकावला असून पंजाब येथे होणाऱ्या राष्ट्रीय धनुर्विद्या स्पर्धेसाठी पात्र झाला आहे.
स्वा.रा.ती. मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत आंतर महाविद्यालयीन धनुर्विद्या स्पर्धेचे ज्ञानोपासक महाविद्यालय परभणी येथे बुधवार दि.१८ सप्टेंबर रोजी आयोजन करण्यात आले होते, या स्पर्धेत नांदेड, हिंगोली ,परभणी, लातूर येथील महाविद्यालयाच्या खेळाडूंनी सहभाग घेतला होता. ५० मीटर भारतीय धनुर्विद्या या स्पर्धेत प्रथमेश याने विद्यापीठातून प्रथम क्रमांक पटकावून सुवर्णपदक प्राप्त केले असुन पंजाब येथे होणाऱ्या राष्ट्रीय धनुविद्या स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे. ज्ञानोपासक महाविद्यालय येथे झालेल्या स्पर्धे प्रसंगी माजी मंत्री गणेशराव दुधगावकर प्राचार्य डॉ. शेख मो.बाबर ,प्रा. डॉ. माधव कदम ,प्रशिक्षक तथा पंच महेश शिंदे प्रा, चाटसे , प्रा. डॉ. राजेंद्र तुपेकर यांनी सुवर्णपदक देऊन गौरव केला. या यशाबद्दल प्रथमेश वाघे व क्रीडा संचालक प्रा. गोविंद वाकणकर यांचे ह.शि.प्र. मंडळाचे अध्यक्ष परमेश्वरराव कदम, प्राचार्य वसंत सातपुते, प्राचार्य शेख शकीला, मा.नगरसेवक निलेश राठोड, पत्रकार संघाचे अध्यक्ष बाबासाहेब गर्जे,पंचायत समितीचे मा. सभापती रंगनाथ रोडे, डॉ. गणेश मुंडे. मलिक बागवान ,लक्ष्मण खरात,गायक कृष्णा हाके, पंडित कदम ,सुनील बर्वे महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक कर्मचारी आदींनी अभिनंदन केले आहे .



# खुनाचा गुन्हयातील आरोपींना ४८ तासात अटक

**पूर्णा,/प्रतिनिधी:** येथील विजयनगर जवळील रेल्वे स्टेशनच्या मोकळ्या पडीक जागेत काटेरी झुडूपांमध्ये,१४ सप्टेंबर रोजी एका ४५-५० वयोगटातील अनोळखी महिलेचे प्रेत आढळून आले होते.
तिच्या तोंडावर, डोक्यात गंभीर जखमांवरून सदर महीलेचा खून झाला असल्याचे दिसून आल्याने पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी यांनी तात्काळ अपर पोलीस अधीक्षक यशवंत काळे, जीवन बेनीवाल,अशोक घोरबांड पोलीस निरीक्षक स्थागूशा परभणी यांना मार्गदर्शनकरून स्टाफसह घटनास्थळी भेट देऊन सदर गुन्हा उघडकीस आणण्याबाबत सूचना दिल्या होत्याा. सोबत फॉरेन्सीक टिमला रवाना केली होती. यावरून सहाय्यक पोलीस अधीक्षक जीवन बेनीवाल अधीक्षक, अशोक घोरबांड पोलीस निरीक्षक स्वागूशा परभणी यांनी स्वागूशाचे पी. डी. भारती सपोनि व अंमलदार रंगनाथ दूधाटे, हनूमान ढगे, सचिन भदगें, दिलीप निलपत्रेवार, परसराम गायकवाड यांना सोबत घेऊन सदर गुन्हयाचे घटनास्थळाला भेट दिली. सदर गुन्हयातील घटनास्थळाची फॉरेन्सीक टिमसह बारकाईने पाहणी केली. तसेच पारंपारीक तपास पध्दती व गूप्त बातमीदारांकडून मयत महीलेचा फोटो व्हॉटसॲपवर व्हायरल करून यातील मयत महीला ही रमाबाई भ्र. अनिल चिकाटे वय ५० वर्षे रा. विजयनगर पूर्णा हि ओळखदाराकडून असल्याचे निष्पन्न केले. सदर प्रकरणी यातील मयत महीलेचा मूलगा श्याम अनिल चिकाटे वय २९ वर्षे व्यवसाय मजूरी रा. सिध्दार्थनगर पूर्णा याचे फिर्यादयसन पो. स्टे.



पूर्णा येथे गूरनं ३११/२४ कलम १०३(१), २३८ भान्यासं प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे. सदर गुन्हयाचा स्थागूशा परभणी व पो. स्टे. पूर्णा यांचेकडून संयूक्तपणे तपास सुरू असताना गूप्त बातमीदाराकडून खात्रीशीर माहीती मिळाली की, सदरचा गुन्हा माणिक मूळे रा. पूर्णा याने त्याचे साथीदारसह केला आहे. सदर माहीतीवरून आरोपी माणिक रामचंद्र मूळे वय ४० वर्षे रा. शिवाजीनगर पूर्णा यास ताब्यात घेऊन त्याचेकडे विश्वासाने विचारपूस केली असता, यातील माणिक मूळे व मयत महीला नामे रमाबाई चिकाटे हिचे दारू अडडयासमोर दारू पिण्याचे कारणावरून वाद झाला होता. सदर महीलेने त्याला दास घेण्यासाठी दहा रूपये मागितले असता, त्याने तिला दहा रूपये न दिल्याने तिने त्याला चप्पलने मारले. त्याचा राग मनात धरून आरोपी याने दारू पाजण्याचे बहाण्याने रेल्वे पटरीच्या बाजूला मोकळ्या जागेत नेले व त्या दोघांनी दारू पिली. त्यावेळी त्या ठिकाणी माणिक मूळे याच्या ओळखीचे दोघेजन तिथे आले. त्या चौघांनी मिळून एकत्रीत दारू पिली व सर्वांसमक्ष चपलेने मारल्याच्या कारणावरून तिच्या तोंड व डोके देगडाने ठेचून मारून तिचा खून केला व पूराचा नष्ट करण्याच्या उददेशाने तिचा मृतदेह तिघांनी फरपटत आणून काटेरी झुडूपात फेकून दिला नमूद महीलेच्या खूनामध्ये आरोपी माणिक रामचंद्र मूळे वय ४० वर्षे रा. मूळेगल्ली शिवाजीनगर पूर्णा,आवेज कुरेशी युसुफ कुरेशी वय ३० वर्षे ,शादुल कुरेशी युसुफ कुरेशी वय २६ वर्षे दोन्ही रा. कुरेशी मोहल्ला, पुर्णा यांनी गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर तिन्ही आरोपींना स्थागूशा पथकाने ताब्यात घेतले असून, त्यांना पूढील कायदेशीर कार्यवाहीस्तय पो. स्टे. पूर्णा यांच्या ताब्यात दिले आहे. सदरची कामगिरी पोलीस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी यांचे मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधिक्षक यशवंत काळे यांचे नेतृत्वात जीवन बेनीवाल भापोसे उपविपोअ जिंतूर चार्ज पूर्णा,अशोक घोरबांड पोलीस निरीक्षक स्थागूशा परभणी, विलास गोबाडे पोलीस निरीक्षक पूर्णा, पी. डी. भारती सपोनि स्थागूशा परभणी,रामकिशन नांदगावकर सपोनि, पोउपनि चंदनसिंह परीहार, पोउपनि प्रकाश इंगोले, पोलीस अंमलदार रंगनाथ दुधाटे, सचिन भवरगे, हनुमान ढगे, दिलीप निलपत्रेवार, परसराम गायकवाड, साहेब मानेबोईनवाड, अजय माळकर, संदीप चौरे, मंगेश जूकटे, रमाकांत तोटेवाड, गणेश कौटकर, प्रशांत लटपटे, स्वप्नील पोतदार यांनी पार पाडली आहे. यातील अनोळखी मयत महीलेच्या खूनाची उकल सत्वरतेने केल्याने पोलीस अधीक्षक यांनी अभिनंदन केले आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# पालिका कर्मचाऱ्यांकडून स्वच्छता हीच सेवा उपक्रमातून श्रमदान

## अवघ्या एका तासात रामलीला मैदान केले चकाचक



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ सप्टेंबर**
हिंगोली नगर पालिका अधिकारी, कर्मचाऱ्यांनी मंगळवारी सकाळी स्वच्छता हीच सेवा उपक्रमांतर्गत अवघ्या एका तासात स्वच्छता मोहीम राबवून संपूर्ण रामलीला मैदान चकाचक केले आहे. पालिकेच्या कर्मचाऱ्यांनी सोमवारी येथील सिरेहक शाह बाबा तलाव परिसरही स्वच्छ केला. पालिकेच्या या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

केंद्र आणि राज्य शासनाच्यावतीने स्वच्छता हीच सेवा अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांत हिंगोली नगर पालिकेने शहरातील महत्वाच्या ठिकाणी स्वच्छता मोहीम सुरू केली असून या उपक्रमात अधिकाऱ्यांसह कर्मचारी सकाळपासूनच सहभागी होत आहे. स्वच्छ शहर, सुंदर शहर तसेच माझी वसुंधरा अभियान मोठ्या प्रमाणावर राबविण्यात येत आहे. नगर पालिकेच्यावतीने अनेक ठिकाणी वृक्षारोपनाचे कार्यक्रम राबविण्यात येत असून या रोपांचे संवर्धनही करण्यात येत आहे. तत्कालीन मुख्याधिकारी रामदास पाटील यांनी शहराचा कायापालट करण्यासाठी विविध उपक्रम राबवले होते तसेच केंद्र आणि राज्य शासनाचे पुरस्कार आणि बक्षीसांची लाखो रूपयांची रक्कम मिळवली होती. हाच वारसा विद्यमान मुख्याधिकारी अरविंद मुंढे पुढे चालवित असतांना दिसत आहेत.

मंगळवारी सकाळी नगर पालिकेचे अधिकारी आणि कर्मचारी यांनी येथील रामलीला मैदानावर मुख्याधिकारी अरविंद मुंढे, उपमुख्याधिकारी उमेश हेंबाडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर, कार्यालयीन अधीक्षक शाम माळवटकर, प्रतीक नाईक, देवीसिंह ठाकूर, वसंत पुतळे, संदीप घुगे, विनय साहू, यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते. हातात झाडू, फावडे आणि इतर साहीत्य घेवून अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी मैदानावरील सर्व कचरा, प्लास्टीक पिशव्या आणि इतर साहीत्य उचलून अवघ्या एका तासात रामलीला मैदान चकाचक केले. नगर पालिकेच्या या कार्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# स्वच्छता ही सेवा अभियानांतर्गत ग्रामपंचायतींमध्ये स्वच्छता मोहीम



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ सप्टेंबर**
जिल्ह्यात १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत स्वच्छता ही सेवा अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत दि. १९ ते २१ सप्टेंबर २०२४ या कालावधीत जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये सार्वजनिक ठिकाणाची श्रमदानातून साफसफाई केली. जिल्ह्यातील अधिकारी व कर्मचारी तसेच गावातील ग्रामस्थांच्या पुढाकारातून थेट गावात जाऊन एक दिवस गावासाठी या उपक्रमांतर्गत मोठ्या प्रमाणात श्रमदानात सहभाग घेतला .

जिल्हाधिकारी अभिनव गोयल व मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या आदेशानुसार उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) संजय कुलकर्णी यांच्या सनियंत्रणाखाली ही मोहीम राबविण्यात आली. स्वच्छता ही सेवा अंतर्गत श्रमदान मोहीम जिल्ह्यातील सर्व महसूल व जिल्हा परिषदेचे अधिकारी, विभाग प्रमुख तसेच पंचायत समिती स्तरावरील अधिकारी व प्राध्यापक, शिक्षक, ग्रामसेवक, गट समन्वयक कर्मचारी सहभागी होऊन ग्रामस्थाच्या मदतीने सर्व ग्रामपंचायतीमध्ये श्रमदानातून सार्वजनिक ठिकाणे, मंदिर, शाळा, ग्रामपंचायत, आरोग्य उपकेंद्र, अंगणवाडी परिसरात स्वच्छता तसेच नदी घाट परिसरात स्वच्छता करुन या सर्व ठिकाणाची श्रमदानातून साफसफाई करण्यात आली. स्वच्छतेची प्रतिज्ञा घेण्यात आली. आईच्या नावाने एक झाड हा वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला.

यामध्ये गावातील ग्रामस्थ, ज्येष्ठ नागरिक, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, महिला सदस्य, महिला बचत गटातील सदस्य, रोजगार सेवक, शाळेचे विद्यार्थी,गावातील व्यायाम मंडळ, सार्वजनिक गणेश मंडळ, भजनी मंडळ, युवा क्रीडा मंडळ आदींचा मोठ्या प्रमाणात सहभाग घेण्यात आला.

# दिव्यांग व्यक्तींना अंत्योदय शिधा पत्रिकेचे वाटप



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ सप्टेंबर**
येथील तहसील कार्यालयात जिल्हा पुरवठा अधिकारी राजेश पुंजल यांच्या आदेश अन्वये दिव्यांग व्यक्तींना अंत्योदय शिधा पत्रिकेचे वितरण करण्यात आले.

शासनाने दिव्यांग व्यक्तींना स्वतंत्रपणे अंत्योदय शिधापत्रिका देण्यासाठी आणि त्यावरील देय लाभ तात्काळ देण्यासाठी शासन निर्णय निर्गमित केलेले आहे. त्या अनुषंगाने हिंगोली तहसील कार्यालयात तहसीलदार श्रीकांत भुजबळ यांच्या कार्य तत्परतेने दिव्यांग व्यक्तींचे शिधापत्रिका ऑनलाईन करून त्यांचे ई-रेशन कार्ड संगणकीकृत करून दिव्यांग व्यक्तींना त्यावरील देऊ असलेल्या लाभ देण्यासाठी आवश्यक कार्यवाही केली. दिव्यांग व्यक्तींनी सदरील योजनेचा लाभ घ्यावा व सदरील प्रक्रिया पुरवठा विभाग तहसील कार्यालयात सुरू असल्याने दिव्यांग व्यक्तींनी आवश्यक कागदपत्रासह संपर्क करण्याचे आव्हान तहसीलदार श्रीकांत भुजबळ यांनी केले.

याप्रसंगी उपविभागीय अधिकारी घुटुकडे जिल्हा पुरवठा अधिकारी राजेश पूंजल, तहसीलदार श्रीकांत भुजबळ यांच्या हस्ते दिव्यांग व्यक्तींना ई-शिधापत्रिका देण्यात आले. या प्रसंगी नायब तहसीलदार अनिल घुगे, अव्वल कारकून अनिल पगारे, सय्यद इशरत अली, उमरा स्वस्त धान्य दुकानदार मुटकुळे, जिल्हा संघटक शाहनवाज गौरी, खरेदी - विक्री संघाचे व्यवस्थापक आसिफ गौरी, मोतीराम इंगोले, गोपाळ कऱ्हाडे, जावेद पठान उपस्थित होते. यावेळी सदर योजनेचे लाभार्थी सिंधू नारायण गायकवाड, प्रीती भारत कांबळे, विभा रायचंद जैन, प्रमोद बळीराम नांदनकर, नजमा हसन शेख इत्यादी लाभार्थी होते.



**हिंगोली- येथील रामलीला मैदानावर ऐतिहासिक सार्वजनिक दसरा महोत्सवाची जय्यत तयारी करण्यात येत असून मैदानावर प्रदर्शनीत विविध खेळाचे साहीत्य, आकाशपाळणा आदीचे आगमन झाले असून कारागीरामार्फत हे सामान उभारण्यात येत आहे. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### रेशीम उत्पादक शेतकरी अभ्यास दौऱ्यासाठी रवाना

हिंगोली- हिंगोली जिल्ह्यातील रेशीम उत्पादक लाभार्थ्यांचा शेतकरी अभ्यास दौरा रूई ता.गेवराई जि.बीड व जालना येथील रेशीम मार्केट व शेतीस भेट देण्यासाठी आज रवाना झाले आहेत. या दौऱ्यास जिल्हा रेशीम विकास अधिकारी पी. एस. देशपांडे यांनी हिरवा झेंडा दाखवून रवाना केला. या दौऱ्या दरम्यान रूई ता.गेवराई जि.बीड येथील प्रगतशील रेशीम उत्पादक शेतकऱ्यांना भेटी देणार आहेत. तसेच जालना येथील रेशीम मार्केट व प्रगतशील शेतकऱ्यांना भेटी देणार आहेत. यावेळी वरिष्ठ तांत्रिक सहाय्यक अशोक वडवळे, गजानन काचगुंडे तसेच नितीन लोलगे, राजू रणवीर, रजनीश कुटे, कुलदीप हरसुले, केतन प्रधान, कु.राधा पाटील, रमेश भवर, तान्हाजी परघणे आदी शेतकरी उपस्थित होते.

### हिंगोली, कळमनुरी विधानसभा उबाठालाच



हिंगोली- हिंगोली जिल्ह्यातील उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे सर्व पदाधिकारी नुकतेच मुंबईतील मातोश्री इथे उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या भेटीला गेले होते. यावेळी पदाधिकारी यांनी हिंगोली विधानसभा आणि कळमनुरी विधानसभा शिवसेना गटालाच देण्याची मागणी केली. या मागणीला प्रतिसाद देत शिवसेना प्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी हिंगोली आणि कळमनुरी विधानसभेची जागा शिवसेनेलाच देण्यात येईल, असे आश्वासन दिले. यावेळी हिंगोली शिवसेना गटाचे जिल्हाप्रमुख संदेश देशमुख, जिल्हाप्रमुख गोपू पाटील, उपजिल्हाप्रमुख परमेश्वर मांडगे, उद्धवराव गायकवाड, गणेश शिंदे, भानुदास जाधव, संतोष देवकर आदींची उपस्थिती होती.

### येहळेगाव सोळंके येथे साखळी उपोषण

औंढा नागनाथ- मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्या समर्थनार्थ तसेच शासनाच्या निषेधार्थ येहळेगाव सोळंके येथे सकल मराठा समाजाच्यावतीने साखळी उपोषणाला सुरूवात करण्यात आली आहे. सगेसोयरे अधिसूचनेची अंमलबजावणी करा, हेद्राबाद, सातारा आणि बॉम्बे गॅझेट लागू करा, मराठा बांधवांवर दाखल झालेले गुन्हे मागे घ्या, कुणबी नोंदीच्या आधारावर प्रमाणपत्रे वितरीत करा, मराठा आणि कुणबी एकच असल्याचा अध्यादेश काढा या मागण्यांसाठी सकल मराठा समाजाच्यावतीने साखळी उपोषण सोमवार दि २४ सप्टेंबर पासून सुरू करण्यात आले आहे. यावेळी मोठ्या संख्येने मराठा बांधव सहभागी झाले आहेत.

# शिवसेना आ. बांगर यांच्याकडून वाटप होत असलेल्या पैशाची चौकशीची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ सप्टेंबर**
कळमनुरी विधानसभा मतदार संघाचे शिवसेना शिंदे गटाचे आ. संतोष बांगर हे मोठ्या प्रमाणात महिलांना पैशाचे वाटप करीत आहेत. वाटप करण्यात येत असलेल्या पैशाची चौकशी करण्याची मागणी उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेना गटाच्यावतीने पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांचेकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, कळमनुरी मतदारसंघाचे शिवसेनेचे आ. संतोष बांगर हे महिलांना मोठ्या प्रमाणात पैशाचे वाटप करीत आहेत. आतापर्यंत लाखोंचे वाटप करण्यात आले असून हा पैसा जिल्ह्यात चालविल्या जाणाऱ्या अवैध धंदे अवैध वाळू, नकली दारू, प्रतिबंधीत गुटखा, जुगार अड्डे, मटका यामधून येत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. पैशाच्या माध्यमातून मतदारांना प्रलोभने देण्याचे काम चालू असून या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची तसेच अवैध वाटप बंद करण्याची मागणी उबाठा शिवसेनेच्यावतीने निवेदनात करण्यात आली आहे. निवेदनावर जिल्हाप्रमुख गोपू पाटील, माजी आ. डॉ. संतोष टारफे, बाळासाहेब मगर, डॉ रमेश मस्के, अजित मगर, आनंद जगताप आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# कोतवाल संवर्गाला चतुर्थ श्रेणीचा दर्जा देण्यासाठी धरणे आंदोलन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली २४ सप्टेंबर**
कोतवाल संवर्गाला चतुर्थ श्रेणीचा दर्जा द्यावा यासह इतर प्रलंबीत मागण्यांसाठी येथील तहसील कार्यालयासमोर दि २४ सप्टेंबर रोजी कोतवाल संघटनेच्यावतीने धरणे आंदोलन करण्यात आले. मागण्या मान्य न केल्यास २५ सप्टेंबर पासून बेमुदत काम बंद आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

२४ तास शासनाचची व जनतेची सेवाकरणाऱ्या कोतवालास आंदोलनाची वेळ येऊ न देता मागण्याचा सहानुभूतीपुर्वक विचार करून मागण्या मान्य कराव्यात जेणेकरून मूलभूत गरजा पूर्ण करून किमान समाधानकारक जीवन जगता येईल. मागण्या मान्य न केल्यास २५ सप्टेंबरपासून जिल्हास्तरावरकाम बंद आंदोलन करण्यात येईल. तसेच दि २६ सप्टेंबर पासून आझाद मैदान मुंबई येथे मागण्यां मान्य होईपर्यंत बेमुदत काम बंद धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. निवेदनावरतालुका अध्यक्ष प्रल्हाद घोडके, शेख मुस्ताक,सचिव शिंदे, संपर्क प्रमुख दिपक खंदारे, नितेश गाडेकर, गजानन साखरे, सुनिता पोटे, मंदाकिनी मुळे, चंचला बोरकर, मारुती खंदारे, आशा जावळे शेख माजीद, गोरखनाथ वायकुळे, गणेश उबाळे, साईनाथ फलटणकर, सीमा खंदारे, वैशाली भोसले, नितेश खिल्लारे, सागर पुरी, संतोष मानमोठे, सचिन राठोड, अमोल कुरवाडे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# अनुदानासाठी शेतकऱ्यांनी ई-केवायसी करावी- तहसीलदार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ सप्टेंबर**
हिंगोली तालुक्यातील सर्व ई केवायसी न झालेल्या बाधित शेतकऱ्यांनी अनुदान खात्यात जमा करून घेण्यासाठी आपले सरकार सेवा केंद्रात ई-केवायसी करून घ्यावी, असे आवाहन तहसीलदार श्रीकांत भूजबळ यांनी केले आहे.

माहे नोव्हेंबर २०२३-२४ अवेळी पाऊस/गारपीट व अतिवृष्टीमुळे हिंगोली तालुक्यातील बाधित झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची शासनातर्फे अनुदान प्राप्त झाले आहे. याबाबतच्या याद्या ई पंचनामा पोर्टलवर अपलोड करण्यात आल्या आहेत.सदर याद्यास मान्यता मिळाली असून विशिष्ट क्रमांक व्हीके नंबर तयार झाले आहेत. या क्रमांकाच्या सहाय्याने शेतकऱ्यांनी आपले सरकार सेवा केंद्र येथे जाऊन ई केवायसी केल्याशिवाय अनुदान खात्यात जमा होत नाही. ई केवायसी न केल्यामुळे गावातील प्रलंबीत शेतकऱ्यांची यादी व विशिष्ट क्रमांक व्हीके नंबरची यादी तलाठी कार्यालय येथे प्रसिध्द करण्यात आली आहे. शेतकऱ्यांनी येत्या ३ दिवसात आपले सरकार सेवा केंद्रात जाऊन ई केवायसी करून घ्यावी ई केवायसी न केल्यापासून अनुदानापासून वंचीत राहील्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत शेतकऱ्याची राहील. तालुक्यात ई केवायसी न झालेल्या शेतकऱ्यांची संख्या ४ हजार २३८ शेतकरी आहेत. व्हीके क्रमांक सांगून आधार क्रमांकांशी संलग्न असलेल्या खात्यात अनुदानाची रक्कम तत्काळ जमा होणार आहे. तलाठी, कोतवाल यांच्या मार्फत शेतकऱ्यांना वैयक्तीरित्या कळविण्यात येणार आहे. ईकेवायसी न केल्यामुळे अनुदानाची रक्कम अजूनही शासनाच्या खात्यावर पडून आहे. नागरिक, शेतकऱ्यांनी तत्काळ ई केवायसी करावी तसेच ईपीक पाहणीही लवकरात लवकर करून घ्यावी असे आवाहन तहसीलदार श्रीकांत भूजबळ यांनी केले आहे

# मयत पशुधन मालकांना ११ लाख ४५ हजार सानुग्रह अनुदान वाटप



**तभा वृत्तसेवा**
**औंढा नागनाथ, २४ सप्टेंबर**
१ आणि २ सप्टेंबर रोजी औंढा नागनाथ तालुक्यात अतिवृष्टी झाली. या अतिवृष्टीमध्ये शेतकऱ्यांच्या मोठ्या प्रमाणात नुकसान झाले तसेच शेतकऱ्यांची ७० जनावरे दगावली होती. शासनाने ११ लाख ४५ हजार ५०० रूपयांचे अनुदान दिले असून धनादेशाद्वारे मयत पशुधन मालकांना तहसीलदार हरिष गाडे यांचेहस्ते धनादेशाक्षद्वारे वितरीत करण्यात आले आहे.

सप्टेंबर महिन्याच्या एक आणि दोन सप्टेंबर रोजी औंढा नागनाथ तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे पुर आला. या पुरात दुभती आणि ओढकाम जनावरे वाहून गेली तर काही जनावरे दगावली. त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. तहसील कार्यालयाच्यावतीने पंचनामे करून नुकसान भरपाईचा अहवाल शासनाकडे पाठविण्यात आला होता. शासनाने मयत ७० जनावरांच्या ३८ मालकांना ११ लाख ४५ हजार ५०० रूपयांचे सानुग्रह अनुदान मंजूर झाले. सदरील अनुदान मयत पशुधन मालकांना तहसीलदार हरिष गाडे यांच्याहस्ते धनादेशाद्वारे वाटप करण्यात आले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# जनतेतून निवडून आल्याशिवाय जनतेला न्याय देता येत नाही: आ. रातोळीकर

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव, दि. २४ सप्टेंबर -**

भाजपचा जिल्हाध्यक्ष असताना शासन स्तरावर जी कामे सन्मानपूर्वक झाली, त्या तुलनेत विधान परिषद सदस्य असताना २५ टक्केही कामे झाले नाहीत. जनतेतून निवडून आल्या शिवाय कार्यकर्त्यांना जनतेला न्याय देता येत नाही, लोकसभेची उमेदवारी मलाच मिळावी, असा माझा आग्रह नसला तरी उमेदवारी देताना सर्वांशी चर्चा करून, सर्वांना विश्वासात घेऊन उमेदवारी दिली जावी असे प्रतिपादन माजी आमदार राम पाटील रातोळीकर यांनी व्यक्त केले. मला उमेदवारी मिळेल अथवा न मिळेल आपली निशाणी कमळच असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आगामी लोकसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रातोळी येथे दि.२२ सप्टेंबर रोजी आयोजित देगलूर-बिलोली व नायगाव विधानसभा मतदारसंघातील कार्यकर्ता संवाद बैठकीत ते बोलत होते.



यावेळी या संवाद बैठकीस माजी जि.प. सदस्य बालाजी ब्चेवार, राजेश कुंटूरकर, अशोकराव पाटील मुगावकर, शिवराज गाडीवान, माजी जि प सदस्य माणिकराव लोहगावे, निलेश देशमुख, चंद्रकांत पाटील सावळीकर, अनिल पाटील खानापूरकर, रविंद्र पोतगंटीवार, शंकर पाटील कल्याण, लक्ष्मण पाटील देगलूरे, संग्राम हायगले, उमाकांत गोपछडे, धनराज शिरोळे, माधवराव चिंतले, सुहास पाटील टाकळीकर, नामदेव वजीरगावे, विजय ढगे, श्रीनिवास नरवाडे, शंकर काळे, यादवराव तुडमे, हावगीराव गोपछडे उपस्थित होते.

पुढे बोलताना रातोळीकर म्हणाले माजी मंत्री अशोकराव चव्हाण, प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी एकत्र बसून निर्णय घ्यावा व लोकसभेची उमेदवारी मलाच मिळावी, असा माझा आग्रह नसला तरी उमेदवारी देताना सर्वांशी चर्चा करून, सर्वांना विश्वासात घेऊन उमेदवारी दिली पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले. २०१९ मध्ये ज्या पद्धतीने नेत्यांनी कार्यकर्त्यांना सोबत घेऊन काम केले, त्याच पद्धतीने २०२४ च्या निवडणुकीत माझ्यासह सर्व नेत्यांनी कार्यकर्त्यांना विश्वासात घेतले का? असा सवालही त्यांनी उपस्थित केला. नांदेड जिल्ह्याचे नेतृत्व खा. अशोकराव चव्हाण तसेच प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी एकत्र बसून चर्चा करून ही लोकसभेची पोटनिवडणुक जिंकून आणली पाहिजे, असे सांगून रातोळीकर यांनी जनतेतून, कार्यकर्त्यांच्या माध्यमातून निवडून आलो, तर कार्यकर्त्यांना योग्य ती संधी देता येईल, शासनस्तरावर जनतेची कामेही सन्मानपूर्वक करता येतील, त्यामुळे पुन्हा विधान परिषदेवर न जाता आपण निवडणुकीला सामोरे जावे, असा मनाशी पक्का निर्धार करून आपण लोकसभा पोटनिवडणुकीच्या मैदानात उतरण्याच्या तयारीत आहोत, त्यासाठी सर्व कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांचे सहकार्य आपल्या पाठीशी राहील, असा आत्मविश्वास माजी आमदार राम पाटील रातोळीकर यांनी व्यक्त केले. यांनी आगामी काळात नांदेड जिल्ह्यालाही विधान परिषदेच्या दोन जागा मिळण्याची संधी उपलब्ध होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. उमेदवारी कोणालाही मिळो, आपला उमेदवार कमळ हे चिन्ह समजून कार्यकर्त्यांनी झटून कामाला लागावे असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. लवकरच मुखेड विधानसभा क्षेत्रातील कार्यकर्ता संवाद बैठकीचे आयोजन करण्यात येणार असल्याचीही माहिती त्यांनी दिली. यावेळी भाजपाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# ...लई मजबूत 'भीमाचा' किल्ला!
## सारखणीच्या मेळाव्याला अलोट गर्दी

**तभा वृत्तसेवा**
**किनवट, दि. २४ सप्टेंबर -**

राज्यातील महायुतीच्या सरकारने सुरु केलेल्या लाडकी बहीण योजनेला किनवट मतदारसंघात अभूतपूर्ण प्रतिसाद लाभत आहे या मतदारसंघाचे कार्यतत्पर आमदार भीमराव केराम यांच्या प्रमुख उपस्थितीत किनवट तालुक्यातील सहाही सर्कलमध्ये लागोपाठ झालेल्या महिला संवाद मेळाव्याला सर्वच समाजघटकातील महिलांची अलोट गर्दी दिसून आली.२१ सप्टेंबर रोजी सारखणीत झालेला मेळावा वैशिष्ट्यपूर्ण ठरला असून या मेळाव्यात बंजारा समाजातील महिलानी कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच बंजारा समाजातील प्रसिद्ध पारंपारिक लेंगी नृत्य सादर करून आमदार भीमराव केराम व मान्यवरांचे जंगी स्वागत केल्याने लाडक्या बहिणीच्या पाठबळामुळे भीमराव केराम यांचा किल्ला आणखी मजबूत झाल्याची चर्चा होत आहे.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार सरकारने लागू केलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा किनवट विधानसभा क्षेत्रात सर्वत्र डंक वाजू लागला आहे. कर्तव्यतत्पर आमदार भीमराव केराम यांच्या प्रमुख उपस्थितीत किनवट तालुक्यात लाडकी बहीण योजनेचे सर्कलनिहाय महिला संवाद मेळावे संपन्न झाले. या मेळाव्याला सर्वच समाजघटकातील महिलांचा अभूतपूर्व प्रतिसाद लाभत असून इस्लापूर, जलधरा,सावरगाव,बोधडी गोकुंदा मांडवी व सारखणी येथील मेळाव्याला ग्रामीण भागातील गोरगरीब उपेक्षित वंचित व दुर्बल घटकातील महिलांची अलोट गर्दी उसळली.या भागाचे लोकप्रतिनिधी तसेच लाडकी बहीण योजना समितीचे अध्यक्ष या नात्याने आ. भीमराव केराम हे पदाधिकारी तसेच प्रशासनातील अधिकाऱ्यांना सोबत घेऊन प्रत्येक पात्र महिलांना लाडकी बहीण योजनेत समाविष्ट करून लाभ मिळवून देण्यासाठी परिश्रम घेत आहेत. २१ सप्टेंबर रोजी सारखणीत झालेला मेळावा वैशिष्ट्यपूर्ण ठरला.मेळाव्याला सारखनी परिसरातील १५ ते २० गावातील तीन हजाराच्या आसपास महिलांनी उपस्थिती दर्शविली.या वेळी कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थितापैकी बंजारा समाजातील शेकडो महिलांनी बंजारा समुदायात प्रसिद्ध असलेले पारंपरिक लेंगी नृत्य सादर करून आमदार भीमराव केराम व मान्यवरांचे जंगी स्वागत केले. लाडक्या बहिणी योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी आमदार आमच्या गावापर्यंत येत आहेत. या योजनेतून मिळणाऱ्या पैशातून आम्हाला मोठा आधार लाभला आहे. आमदार केराम भेदभावाचे राजकारण करत नाहीत म्हणून आम्ही त्यांची साथ सोडणार नाही अशा भावना लेंगीनृत्य सादर केलेल्या महिलानी व्यक्त केल्याने हा मेळावा चर्चेचा विषय बनला आहे. या

निमित्ताने आमदार भीमराव केराम हे सर्वसमावेशक व विकासाभीमुख नेतृत्व असल्याचे स्पष्ट झाले असून जातीपातीच्या राजकारणाला विकासात्मक कामातून एक प्रकारे तिलांजली मिळाल्याची चर्चा होत आहे. आमदार भीमराव केराम यांच्या प्रयत्नामुळे लाडकी बहीण योजनेच्या प्रभावी अंमलबजावणी किनवट मतदार संघाने नांदेड जिल्ह्यात नावलौकिक प्राप्त केला आहे.आगामी निवडणुकीत याचा मोठा फायदा मिळण्याच्या भाजपाच्या आशा बळवल्या असून किनवट मतदारसंघातील चौफेर विकासकामे आणि सर्वच समाजातील लाडक्या बहिणीच्या पाठबळामुळे आमदार भीमराव केराम यांच्या किल्याला आणखी मजबुती प्राप्त झाली आहे.

## संक्षिप्त वृत्त

### रेल्वे खाली उडी मारून शेतकऱ्याची आत्महत्या

**मुदखेड**-मुदखेड तालुक्यातील सरेगाव येथील प्रकाश आनंदराव गिरे (वय ५३) यांनी सततच्या नापिकीला कंटाळून तसेच सावकारी व बँक कर्जाच्या



सततच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना नुकतीच घडली आहे. राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा दिवसेंदिवस वाढतच असून मराठवाड्यात सर्वात जास्त आत्महत्या पहावयास मिळत आहेत. सध्या मागच्या दोन आठवड्या पूर्वी झालेल्या अतिवृष्टीमुळे पुरात सर्वच पीक वाहून गेल्याने कर्ज कसे फेडावे व सावकाराच्या जाचामुळे चिंताग्रस्त शेतकरी प्रकाश आनंदराव गिरे यांनी धावत्या रेल्वेच्या समोर येऊन स्वतःचे आयुष्य संपविले आहे. बँकेचे कर्ज, सावकारी कर्ज तसेच नापिकी व अतिवृष्टीने हातचे गेलेले पीक यामुळे गिरे चिंताग्रस्त होते. शेतकऱ्याच्या आत्महत्ते प्रकरणी पुढील तपास रेल्वे पोलीस करीत आहेत.

### संजयगांधी निराधार योजनेचे ३३७ अर्ज मंजूर

**उमरी**-संजय गांधी निराधार समितीचे उमरी तालुकाध्यक्ष आमदार राजेश पवार यांच्या अध्यक्षतेखाली घेतलेल्या उमरी संजय गांधी निराधार योजनेच्या बैठकीत ३३७ अर्ज मंजूर करण्यात आले आहे .उमरी तालुका संजय गांधी निराधार समितीच बैठक दि २३ सप्टेंबर २०२४ रोजी आमदार राजेश पवार यांच्या मान्यतेनुसार बैठक घेण्यात आली. संजय गांधी निराधार योजना , इंदिरा गांधी योजना , श्रावणबाळ योजना असे एकूण ३३७ अर्ज मंजूर करण्यात आले आहे उमरी तालुका नांदेड जिल्हात अर्ज मंजूरी करण्यात दुसरा क्रंमाक येतो असे एवढे अधिक अर्ज मंजूरी आमदार राजेश पवार यांनी केल्याने हजारो लाभार्थींना लाभ भेटत आहे वयवृद्ध, निराधारांना मध्ये समाधान व्यक्त करण्यात येत आहे यावेळी तहसीलदार प्रशांत थोरात, गटविलास अधिकारी अरबडवाड, नायब तहसीलदार संजय सोलंकर, निराधार समिती सदस्य सुभाषराव पेरेवार, सौ. आदीमाया कदम, सेवानिवृत विस्तार अधिकारी बालाजी माचेवाड, साहेबराव तुरेराव, अविनाश पा . शेलगावकर, पेशकर टेंकुर्णीवार, महसुल सहाय्यक दिलीप शेट्टेवाड, धनजंय बोधनकर, अशोक कस्तुरे आदी उपस्थित होते.

### राज्यस्तरीय शिक्षक गौरव पुरस्कार २०२४ ने यादव गायकवाड सन्मानित

**नांदेड** - जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा पांगरा शिंदे ता.वसमत जिल्हा हिंगोली येथील प्राथमिक शिक्षक श्री यादव कामाजी गायकवाड यांना समर्थ फाउंडेशन ठाणे व एजुरिक हब ठाणे यांच्या तर्फे देण्यात येणारा राज्यस्तरीय शिक्षक गौरव पुरस्कार २०२४ प्रदान करण्यात आला.मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे येथील सभागृहात कोकण पदवीधर मतदार संघाचे विधान परिषद सदस्य आमदार ड. निरंजन डावखरे, ठाणे वैभव वर्तमानपत्राचे संपादक मिलिंद बल्लाळ, समर्थ फाउंडेशन व एजुरिक हब ठाणे चे संस्थापक प्रा. डॉ दिपक साबळे, ड.सुनीता साबळे यांच्या हस्ते श्री यादव गायकवाड यांना 'राज्यस्तरीय शिक्षक गौरव पुरस्कार २०२४' या शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# होलार समाजाला विकासाच्या प्रवाहात आणणार : बालाजी पा.खतगावकर

**तभा वृत्तसेवा**
**मुक्रमाबाद, दि. २४ सप्टेंबर -**

मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद येथे अखिल भारतीय होलार समाज संघटनेच्या वतीने होलार समाजाचा भव्य मेळावा आयोजित करण्यात आला होता . विखुरलेल्या समाजाला जागे करण्यासाठी हा धगधगता मेळावा आयोजित कार्यक्रम २२ सप्टेंबर२०२४ रोजी रविवारी ग्राम पंचायत कार्यालय मैदान मुक्रमाबाद येथे आयोजित करण्यात आले होते.



या कार्यक्रमाला सैराट फेम रिंकु राजगुरु अर्थात आर्ची हिची प्रमुख उपस्थित राहुन प्रेक्षकांची मने जिंकली. मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलीत करुन कार्यक्रमाला सुरुवात झाली.कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे भा.ज.पा.चे प्रदेश निमंत्रित सदस्य व्यंकटराव पाटील गोजेगावकर ,पं.सचे मा.सभापती अशोक पाटील रावीकर ,रामचंद्र पाटील गोजेगावकर , सरपंच सौ.अंजिताताई ,बालाजी बोधणे, ग्रा.प. सदस्या अनुसया बोयवार, सुरेश पंदीलवार, सुभाष अप्पा बोधने, असफअली कोतवाल, गौसखाँ पठाण, सादिक तांबोळी, सह परीसरातील हजारो कार्यकर्ते उपस्थित होते.आपल्या अध्यक्षिय भाषणात प्रा.वैजनाथ सुरनर यांनी माझा होलार समाज हा दुबळा समाज आहे ,विकासापासुन कोसो दुर असल्यामुळे संघटीत होण्याचे अवाहाण केले. मुख्य प्रमुख पाहुणे भावी आमदार बालाजी पाटील खतगावकर यांनीआपली भूमिका मांडताना होलार समाजाचे पालकत्व स्वीकारुन त्यांचे पुनर्रवसन करण्याचे आश्वासन दिले. जर मला तुम्ही सर्वांनी संधी दिलात तर या मुखेड - कंधार मतदार संघाचा कायापालट करणार असेही यावेळी नमुद केले. लाडकी बहीण योजना आता ही कायमचीच सुरु ठेवावी म्हणून काही मुस्लीम महिलांनी खतगावकर यांना राखी बांधल्या.कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित राहील्याबद्दल बेन्नाळचे माजी सरपंच तथा कार्यक्रमाचे आयोजक श्रीकांत काळे यांनी आभार मानले.

# हिमायतनगर तालुक्यातील शिक्षण विभागाला रिक्त पदांचे ग्रहण

**तभा वृत्तसेवा**
**हिमायतनगर, दि. २४ सप्टेंबर -**

हिमायतनगर तालुक्यातील गेल्या अनेक दिवसापासून शिक्षण विभागाचा सावळा गोंधळ चालू असून ९ शाळा हे शिक्षक विना असून या गंभीर बाबीकडे वरिष्ठांचे लक्ष नसल्याचे बोलल्या जात आहे.

मागील में आणि जून मध्ये नांदेड जिल्ह्यातील तालुका निहाय माहिती पाहिली तर सगळ्यात रिक्त पद असलेला तालुका म्हणजे हिमायतनगर तालुक्यातील आकडेवारी ही सगळ्यात कमी होती. या आकडेवारी मध्ये केवळ दहा ते पंधरा शिक्षकांच्या नियुक्ती झाल्या असून उर्वरित पदे रिक्त आहेत. एवढी पदे रिक्त असणारा हा पहिला तालुका असल्याचे बोलले जात आहे. या गंभीर बाबीकडे मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, गटशिक्षणाधिकारी सहशिक्षक यांनी लक्ष देण्याची गरज होती.मे, जुन मध्ये आकडेवारीनुसार १०१ रिक्तपद हिमायतनगर तालुक्यात होती. त्यानंतर पंधरा-वीस भरण्यात आली सध्या ८० पद रिक्त असून यामध्ये महत्त्वाची बाब म्हणजे गटशिक्षणाधिकारी हेच प्रभारी असून हे काय या गंभीर बाबीकडे लक्ष देतील. अस्थापना विभाग प्रभारी, केंद्रप्रमुख ८ असुन यापैकी ४ प्रभारी यासह अनेक पदे प्रभारी असून विद्यार्थी संख्या ही ढासाळत चलली आहे. यामुळे विद्यार्थ्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असून या बाबीकडे जिल्हा शिक्षण अधिकारी यांनी खरच लक्ष देण्याची गरज आहे.

# आरक्षणातील उपवर्गीकरण विरोधातील उपोषणाच्या समर्थनार्थ आज नांदेडमध्ये रस्ता रोको

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. २४ सप्टेंबर -**

एससी, एसटी प्रवर्गाच्या आरक्षणात उपवर्गीकरण करण्याचे अनुषंगाने सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या विरोधात नांदेडमध्ये पुकारण्यात आलेल्या आमरण उपोषणाला पाठिंबा देण्याच्या अनुषंगाने आणि सर्वोच्च न्यायालयाचा निकाल रद्द करण्याच्या मागणीसाठी उद्या दिनांक २५ सप्टेंबर रोजी नांदेड शहरातील महात्मा फुले पुतळ्यासमोर रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे .यावेळी तीव्र निदर्शने ही करण्यात येणार आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने नुकताच एससी, एसटी आरक्षणात उपप्रवर्ग करण्याच्या अनुषंगाने निर्णय दिला होता. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयानंतर देशभरात असंतोषाची लाट उसळली आहे . सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय हा संविधानिक नाही. संविधानाच्या मूल्यांची पायमल्ली करणारा आहे . अधिकारांचे हनन करणारा आहे . शिवाय एससी आणि एसटीचे आरक्षण संपुष्टात आणणारा आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय रद्द बातल ठरवावा. यासाठी राष्ट्रपतींनी वटहुकूम काढावा , मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देऊ नये ही मागणी घेऊन नांदेड येथे सामाजिक कार्यकर्ते अतुल पाईकराव आणि ओबीसी नेते दत्तात्रेय अनंतवार यांनी आयटीआय येथील महात्मा फुले पुतळ्यासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. आमरण उपोषणादरम्यान दोन्हीही उपोषणकर्त्यांची प्रकृती खालावली असून त्यांना जबरदस्तीने आरोग्य सेवा देण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यामुळे या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी आणि सर्वोच्च न्यायालयाचा निकाल रद्द करावा या मागणीसाठी उद्या दिनांक २५ सप्टेंबर रोजी आयटीआय चौक येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे. यावेळी तीव्र निदर्शनेही करण्यात येणार असून एससी , एसटी आणि ओबीसी प्रवर्गातील जनतेने या आंदोलनात सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे .

या अनुषंगाने शिवाजीनगर पोलिसांना निवेदन देण्यात आले असून निवेदनावर प्रशांत इंगोले, निळू पाटील, राहुल चिखलीकर , शीलाताई भवरे, केशवराव थोरात, कावेरी ढगे, गोविंद लांडे, बालाजी खरडे, नाना दुधटवाड, दिलीप राठोड, कैलास राठोड, विशाल सोनकांबळे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# महाराणा प्रतापसिंह आर्थिक विकास महामंडळस मंजुरी

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड, दि. २४ सप्टेंबर -**

महाराणा प्रतापसिंह आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची शासनाने आमदार मोहनराव हंबर्डे यांच्या मागणीस मंजूरी दिली .सह संपूर्ण राज्यातील राजपूत समाजाच्या सर्वांगीण विकास होण्यासाठी नांदेड दक्षिण मतदार संघातील आमदार मोहनराव हंबर्डे यांनी दिनांक २४ मार्च २०२३ रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कडे सदर महामंडळ तातडीने स्थापन करून राज्यातील राजपूत समाजाला न्याय देण्याची मागणी केली होती. तसेच त्या बाबत राज्य शासनाकडे सतत एक वर्षा पासून पाठपुरावा केला होता.



आ. हंबर्डे यांच्या मागणीस यश

त्या अनुषंगाने काल दिनांक २३ सप्टेंबर २०२४ रोजी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत राजपूत समाजासाठी महाराणा प्रतापसिंह आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे .त्यामुळे राज्यातील राजपूत समाजाला न्याय मिळण्याची आशा निर्माण झाली आहे,

अनेक राजपूत समाज बांधवांनी आमदार मोहनराव हंबर्डे यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश मिळाले असल्याने समाधान व्यक्त केले. असून अनेक समाज बांधवांनी आमदार हंबर्डे यांचे आभार मानले आहे .

# प्रकल्पाचे काम न थांबविल्याच्या पार्श्वभूमीवर धरण विरोधी समितीची सभा

**तभा वृत्तसेवा**
**माहुर, दि. २४ सप्टेंबर -**

चिमटा धरण अर्थात निम्न पैनगंगा प्रकल्पाचे काम थांबवा अन् गावे न बुडवता प्रकल्प कसा करता येईल त्याचा अभ्यास करा! अशा स्वरुपाच्या स्पष्ट सूचना देत,सुरू असलेले निम्न पैनगंगा प्रकल्पाचे काम बंद करण्याचे आदेश महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्री ना.देवेंद्र फडणविस यांनी जुलै महिन्यात मुंबई येथे निम्न पैनगंगा धरण विरोधी संघर्ष समिती विदर्भ-मराठवाडाचे पदाधिकारी व पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांच्या आयोजित संयुक्तिक बैठकीत पाटबंधारे विभागाला दिल्या होत्या. मात्र प्रत्यक्षात या आदेशाची कुठेही अंमलबजावणी झाल्याचे दिसत नसून, प्रत्यक्षात धरणाचे काम करण्याच्या हालचालींनी वेग घेतल्याने निम्न पैनगंगा धरण विरोधी ऊर्फ चिमटा धरण संघर्ष समिती विदर्भ मराठवाड्याच्या वतीने दिनांक २७ सप्टेंबर शुक्रवार रोजी दुपारी १ वाजता विदर्भातील यवतमाळ जिल्ह्याच्या आर्णी तालुक्यातील कापेश्वर (जुने) येथील कपिलेश्वर महादेव मंदिरावर निम्न पैनगंगा धरण विरोधी संघर्ष समितीची अतिशय महत्त्वाची व तातडीची बैठक बोलाविण्यात आल्याचे निम्न पैनगंगा धरण विरोधी संघर्ष समितीने कळविले आहे.

विदर्भ मराठवाड्यातील ९५ गावातील जवळपास दिड लाख लोकांना विस्थापित करून त्यांच्या रोजी रोटीवर नांगर फिरू पाहणाऱ्या बहुचर्चित निम्न पैनगंगा प्रकल्पाला गेल्या २७ वर्षापासून विदर्भ मराठवाड्यातील ९५ गावातील शेतकऱ्यांनी तीव्र विरोध दर्शविला आहे.

मागील काही महिन्यांपासून महाराष्ट्र शासनाने निम्न पैनगंगा प्रकल्पाचे काम मराठवाड्यातील किनवट तालुक्यातील खंबाळा येथे सुरू केले होते ते काम निम्न पैनगंगा धरण विरोधी संघर्ष समितीच्या संतप्त कार्यकर्त्यांनी व शेतकऱ्यांनी बंद पाडले.अनेक वेळा परिस्थिती हे स्फोटक देखील झाली होती हे विशेष.

किनवटचे आमदार भीमराव केराम यांनी पुढाकार घेत राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जलसंपदामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे या प्रकल्पाला आपला विरोध असून हा प्रकल्प करणे सोयीचे नाही अशी भूमिका मांडली आणि मुंबई येथे अधिवेशन काळात पाटबंधारे विभाग व पैनगंगा धरण विरोधी संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांची देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत बैठक घडवून आणली. या बैठकीला उमरखेडचे आमदार नामदेवराव ससाने आणि केळापुर-आर्णी विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. संदीप धुर्वे हे देखील मुंबई येथील बैठकीला उपस्थित होते.

बैठकीमधे आमदार भीमराव केराम व धरण विरोधी संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांचा प्रकल्पाला असलेला विरोध पाहता आणी ह्या प्रकल्पात बुडणाऱ्या ९५ पैकी आदिवासी पेसा झोन मधली ४६ गावे व या गावातील दीड लाख लोकांचे विस्थापन होणार असल्याने हा प्रकल्प व्यवहार्य नाही हे पटवून देत आमदार भीमराव केराम व धरण विरोधी संघर्ष समितीने उपमुख्यमंत्री फडणवीस यांना समजवून सांगण्याचा प्रयत्न केला.त्यावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ह्या प्रकल्पात कोणालाही न बुडवता, कोणाचेही विस्थापन न करता जर पाणी मिळत असेल तर त्या पर्यायाचा विचार करण्याचे आदेश उपस्थित असलेल्या पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले व ह्या प्रकल्याचे सुरू असलेले सर्व प्रकारचे काम थांबविण्याच्या सुचनाही दिल्या होत्या.परंतू,प्रत्यक्षात मात्र निम्न पैनगंगा प्रकल्पाचे काम थांबलेले नाही,असे धरण विरोधी संघर्ष समितीचे म्हणने असून, या बाबतीत हरित लवाद,पुणे व औरंगाबाद उच्च न्यायालय येथे याचिका प्रलंबित असतानाही पाटबंधारे विभाग कामाची घाई करीत आहे.तसेच, अनुसूचित क्षेत्रामध्ये ग्रामसभांनी या प्रकल्पाला विरोध दर्शविला असून, हा प्रकल्प नको त्याऐवजी साखळी बंधारे बांधून पिण्याच्या पाण्याची व सिंचनाची व्यवस्था करावी ही समितीची प्रमुख मागणी आहे. या मागणीला राज्याचे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी ९ जुलै २०२४ च्या बैठकीत अधिकाऱ्यांना आदेश दिले असतानाही प्रकल्पाचे काम सुरू करण्यामागे कुठला उद्देश आहे हे कळायला मार्ग नसल्याचे समितीने म्हटले आहे.

प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील १८ गावात पाटबंधारे विभाग व भुमी अभिलेख विभागाचे अधिकारी व कर्मचारी जाऊन तेथील कुटुंबाचे सर्वेक्षण करणे, शेतीची मोजणी करणे, ग्रामसभेचे ठराव प्रकल्पाच्या बाजूने घेण्यासाठी प्रयत्न करणे तसेच, निम्न पैनगंगा प्रकल्पाचे मुख्यस्थळ खंबाळा येथे हेडक्वार्टरचे काम मोठ्या प्रमाणात सुरू केल्याने व राज्य सरकार निम्न पैनगंगा प्रकल्प थांबवण्याच्या दृष्टीने कोणतीही पावले उचलत नाही हे लक्षात येताच निम्न पैनगंगा धरण विरोधी संघर्ष समितीने २७ सप्टेंबर शुक्रवार रोजी दुपारी १ वाजता विदर्भातील कापेश्वर येथील येथील कपिलेश्वर मंदिरासमोरील प्रांगणात बुडीत क्षेत्रातील सर्व शेतकरी, शेतमजूर बांधवांची व कार्यकर्त्यांची अतिशय महत्त्वाची व तातडीची सभा बोलावली आहे.

या बैठकीला बुडीत क्षेत्रातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन धरण विरोधी संघर्ष समितीचे अध्यक्ष प्रल्हादराव पाटील जगताप, प्रसिद्धी प्रमुख तथा संघटक सचिव व यवतमाळ जिल्हा परिषदचे माजी उपाध्यक्ष मुबारक तंवर, कोषाध्यक्ष प्रल्हादराव गावंडे सर, सचिव विजय पाटील राऊत व बंडूसिंग नाईक, कायदेशीर सल्लागार ड. बालाजी येरावार, बाबु भाई फारूकी,डॉ. बाबा डाखोरे, डॉ.सुप्रिया गावंडे,विजय पाझारे,गुलाब मेश्राम,निलेश कुमरे,शेषराव मुनेश्वर, भगवतीप्रसाद तितरे इत्यादींनी केले आहे.